इ५८२
औ/८६

विध

गं

खानापूर येथे

वि

औ/८६

# विधवा दुःख निवेदन.

हा निबंध

गं. भा. सिताबाई छत्रे

ह्यानीं लिहून

खानापूर धनंजय प्रेस मध्यें छापून

बेळगांव येथें प्रसिद्ध केला.

( सर्व प्रकारचे हक राखून ठेविले आहेत )

सन १९०१

किंमत पांच आणे.

पत्ता–वासुदेव कृष्ण मराठे वकील

बेळगांव यांच्या घरीं.

# उद्देश.

आताशा सर्वांचे डोळे आपल्या देशास उर्जित दशा कोणत्या योगानें येईल या गोष्टीकडे लागले आहेत. पण आह्मां ब्राह्मणांत स्त्रिया पतीच्या मरणानंतर कशा पक्क्या पराधीन बनतात, त्यांचे हाल कोणत्या तऱ्हेनें होतात, व त्यापासून त्यांची सुटका कशी होईल याबद्दल निदान करावा तसा उद्योग आमच्या विद्वान बंधूनीं केलेला दिसत नाहीं. यास्तव एक दोन ठळक प्रत्यक्ष घडलेल्या खऱ्या गोष्टी देऊन मी एक सहज होणारा उपाय सुचविला आहे. आमचे बंधू आपली थोडी अमोलिक वेळ खर्च करून हा निबंध एकवार वाचण्याची तसदी घेतील तर आपल्या घरची खरोखर स्थिती कशी आहे, ती त्यांच्या डोळ्यापुढें उभी राहील, व मी सुचविलेला मार्ग विचार करण्यासारखा आहे असें वाटल्यास ते तिकडे लक्ष देतील अशी बळकट आशा बाळगून हा निबंध मी त्यांचे पुढें ठेवितें.

यांत ज्या गोष्टी दिल्या आहेत त्या हुबेहुब घडलेल्या आहेत. तर मी पुनः सांगतें कीं एकवार हा निबंध वाचून पाहण्याची तसदी घ्या इतकेंच माझें मागणें आहे.

सिताबाई छत्रे.
बेळगांव.
१५ जुलै १९०१

# विधवा दुःख निवेदन.

जननिजठरीं गर्भासि येतां पय केलें निर्माण ।
ऐसें असतां या पोटाची कां करूं चिंता जाण ॥

हें जरी खरें आहे, तरी ईश्वर आपण येऊन कोणासही माप मोजून देत नाहीं; मनुष्या कडून देववितो. ह्मणून त्यांतही आपले ज्ञानाची थोडी भर घालून देशांत जी उणीव आहे, ती नाहींशी करणें विद्वानाचें काम आहे. पण चमत्कार हा कीं, विद्वान् आणि अज्ञानी, श्रीमान व दरिद्री हे सर्व लोक सारखे बनून राहिले आहेत. आभाळाला ठिगळ लावण्याची खटपट बरेच लोक करितात, पण आपले अंगांतील फाटलेल्या कपड्याला दोरा घालण्याची आठवण थोड्यांसच होते. त्याच प्रमाणें आमचे देशांतील विद्वान् लोकांची स्थिति आहे. स्त्रीशिक्षणाविषयीं विद्वान लोक विशेष कळकळ दाखवितात; स्त्रियांना इंग्रजी शिकवितात? पण कोणच्या सुधारणे पासून कुटुंबांत आनंद राहून अनास्था न होईल हे ध्यानांत कसें येणार? कारण, जो पहावा तो बहुतेक चैनींत असतो. मागें पुढें पाहतो कोण? राहिलेला वेळ राजकीय कामांत जातो, त्यामुळें फावत नाहीं व आठवणही होत नाहीं. असो; ब्राह्मण विधवांचीं थोडीं गाऱ्हाणीं जनापुढें मी ठेवितें तिकडे लक्ष देणें विद्वानाचें काम आहे. हल्लीं मी जी हकीगत लिहिणार आहे ती अक्षरशः खरी आहे. व तसीच

विधवांची खरोखर स्थिति आहे असें बहुतेकांस आढळून येईल. ह्मणून मी हा लेख जनापुढें ठेवितें. पण असीं कामें बायकांच्या हातून शेवटाला जाणें ह्मणजे ईश्वराचेंच सहाय पाहिजे. कर्ता करविता ईश्वर आहे, निमित्त मात्र मनुष्य. मला विद्या नाहीं, ज्ञान नाहीं, मनुष्याचें सहाय नाहीं; हेतु तर फार मोठा; पण तो सिद्धिला जावा कसा? प्रवासाला निघालेला मनुष्य कालांतरानें फिरून परत येईल; पण जाऊं ह्मणणारा घरींच बसून राहील. ह्मणून मी माझें काम सुरू करतें. यांत यश येऊन तें शेवटास जाणें ह्मणजे आमचे विद्वान बंधू व सुशिक्षित देशभगिनी यांवर अवलंबून आहे.

आतां आपण जेवलों, दुसऱ्याच्या जेवणाची पंचाईत कशाला, असें कोणीही ह्मणूं नये. कारण, आपल्या पोटाहून दुसऱ्याच्या भुकेचा जो मनुष्य विचार करितो त्यालाच जन सुजाण व दयाळू ह्मणतात. तर प्रत्येक मनुष्यानें आपल्या हातून होतांहोई तोंपर्यंत आपल्या देशबांधवांचें दुःख निवारण करून देशाची सुधारणा करावी; ह्मणजे सर्वांचें कल्याण होऊन आपली सुकीर्ति होईल. त्याप्रमाणें आमचे विद्वान् देशबांधव करित आहेतच. पण अद्याप व्हावी तसी सुधारणा झाली नाहीं, असें मला वाटतें. कारण आपल्या कुटुंबांतील कन्या व भगिनी कोणत्या सुधारणेपासून सुखी रहातील व त्यांना कोणत्या प्रकारें हाल सोसण्याचा प्रसंग न येईल हें अद्याप आमचे विद्वान् बांध-

वाचे ध्यानांत येत नाहीं. ते ह्मणतात कीं, आपण फार सुधारणा केली; विद्यालयें घालून स्त्रियांना सुशिक्षित केलें हें खरें. व त्याविषयीं त्यांचे आभार मानावेत; त्याच शिक्षणामुळें जगांत अविचारानें घातलेले नियम व कुटुंबांतील मंडळी-विषयीं जनांचें अपूज्य वर्तन आह्मांस स्पष्टपणें दिसूं लागलें. आमचें जिणें ह्मणजे पुरुषांवर अवलंबून आहे. ह्मणून सर्वांनीं आपल्या कुटुंबाविषयीं काळजी घेतली पाहिजे. व हें जें त्यांचें कर्तव्य मी सांगतें तें त्यांचे हातून होण्या-सारखें आहे. कारण, तें अवघड नाहीं; मात्र सर्वांनीं विचार केला पाहिजे. कारण, **स्त्रिया ह्मणजे पतीच्या मर-णानंतर पक्क्या पराधीन बनतात; ह्मणून त्यांचे जवळ थोडा पैसा असणें अवश्य आहे.** जिच्या नवऱ्यानें थोडा पैसा मिळविला असेल तिचें ठिकच; परंतु जिच्या नव-ऱ्याचा पैसा नाहीं, तिचे हाल कांहीं पुसूं नये. तिनें एका पैशासाठीं कोणाकडे पहावें व कोठें मागावें हा विचार कोणाच्याच मनांत येत नाहीं, याबद्दल मोठें आश्चर्य वाटतें. कारण ही गोष्ट बहुतेकांच्या घरीं अनुभवास येते हें एक. आतां दुसरा प्रश्न असा कीं, तुह्मीं दिलेल्या शिक्षणाच्या मदतीनें एखादा पाय पुढें घालूं ह्मटलें, तर जुनी वहिवाटरुपी जी एक मध्यें आड नदी आहे, ती ओलांडून जावें कसें? बरें; कदाचित् इतकेंही मागें टाकून एखादी स्त्री पुढें गेली, तर तिचेवर निंदेचें वादळ व अपवादाचीं ढगावर ढगें येऊन आदळूं लागलीं ह्मणजे निराश्रीत झालेल्या अबलांना सबल

धैर्य येणार कोठून? आपल्या लोकांत एक ह्मण आहे कीं, " आई जेऊं घालीना आणि बाप भीक मागूं देईना. " या ह्मणीप्रमाणें ते स्वतः आमची व्यवस्था करित नाहींत! व आह्मीं केली तर अब्रू जाते. मिळून हाल कोणाचे? आमचे, आपल्या ब्राह्मण लोकांत स्त्रियांना किती प्रतिबंध आहेत हें वाचकांना माहितच आहे. एखादी मुलगी १२ वर्षांपुढें जर शाळेला गेली, तर लोक तिच्या आईबापांची निंदा करितात; व आपल्या लोकांत निंदेचें किती प्राबल्य आहे हें ही वाचकांना माहीत आहे. एखादी बायको आपले प्रिय पतीचे मदतीनें पुढें गेली, तर तिचीसुद्धां लोक निंदा करितात कीं, आतां आमच्या सगुणाबाई एम्. डी. डॉक्टर होणार; मग तिचे पती कंपाउन्डर होऊन बाटल्या आणून पुढें ठेवणार; मग आमच्या विद्वान बाई त्यांना हुकूम करणार. असी एकच काय, हजार! पण ती आपल्या पतीचे मदतीमुळें कोणाला जुमानीत नाहीं. साहजीकच आहे. आपल्या जन्माचें रक्षण करणारा आपला प्रिय पती सहाय असल्यावर कोणाचीही भिती नाहीं. पण अशा स्त्रिया आपल्या लोकांत कोठें फार झाल्या आहेत. एकट्याच काय त्या कै० सौ० आनंदीबाई जोशी त्या तरी कोठें उदयाला आल्या? आमचे दुर्दैवामुळें त्याना या भूमीवर सहा महिनें सुद्धां राहूं दिलें नाहीं. त्या जर वांचल्या असत्या, तर आमचे दुर्दैवाला कदाचित धक्का बसला असता व त्याला कोठें स्थळ मिळालें नसतें. जशी आकाशांत बांध-

चमकते; पण पुन्हा अंधकार आहे तो आहेच. असो; आमच्या विद्वान भगिनी जर मनांवर घेतील तर सर्व कांहीं होईल. परंतु अशीं कामें पैशाशिवाय होत नाहींत व पैसा असुनही पुरुषाची मदत पाहिजे. पण आपले लोकांत एखादा गृहस्थ आपल्या विद्वत्तेमुळें जर धनसंपन्न झाला तर त्याची स्त्री ऐश्वर्याचे योगानें जीर्ण व अशक्त होते. ह्मणून तिचेसाठीं एखाद्या डाक्टरची नेमणूक करण्याची वेळ येते. मग निराश्रित झालेल्या बाल-विधवांस शिक्षण देण्याचें व देश सुधारण्याचें लांबच राहिलें. आतां एखाद्या स्त्रियेला घरांतील लोकांनीं मदत करावी; पण मदत तर होतच नाहीं. मात्र जनाच्या निंदेस मदत करितात आणि आपलीं चार अक्षरेंही घालितात. आमचें हिनें नांव बुडविलें; हा धंदा चालवून आह्मांला मान खालीं घालावी लागली; आह्मीं अन्न कां घालीत नव्हतों? आतां ह्या स्त्रियांनां हे चाळे हवेत कशाला? स्वस्थ जेवून राम राम ह्मणत बसूंनये? बघा! नवरा नसला ह्मणजे स्त्रिया धीट व हुशार होतात. कोणालाही जुमानित नाहींत. अशा नाना तऱ्हेचे वाग्बाणांनीं विनाकारण घायाळ करितात; बरें सर्वांचे निंदेकडे जर अलक्ष करावें तर जवळ पैसा नाहीं. सर्व जिणें त्यांच्यावर अवलंबून असतें. तिनें कांहीं करूं नये; उजेडल्या पासून संध्याकाळपर्यंत काबाडकष्ट करावेत; आणि तोंडांत मिठाची गुळणी घालून गप रहावें; तरच तिचा निभाव लागेल. ती थोरा-

मोठ्याची असो अथवा भट भिकाऱ्याची असो; तिनें सर्वदां काबाड कष्ट करीत असावें, पती मरून सर्व सुखाला मुकलेली असल्यामुळें तिनें सुख कां घ्यावें? पण मी ह्मणतें तुह्मीं आपले धर्माच्या आड आह्मांला जावूं देऊं नका. आमचा उत्तम वेळ फुकट कां दवडितां? लिहिणें वाचणें शिकविणें, काशिदा काढणें, यापासून कोणाच्या धर्माला धक्का बसत नाहीं ना? पण त्यालासुद्धां दोन अडचणी आहेत एकतर पैसा नाहीं, दुसरें तिनें चांगलें कांहीं करितां कामा नये. आणि इतकेंही असून एखादी जर त्या उद्योगाला लागली, तर लगेच ह्मणण्याला झाली सुरवात, कीं हें हो आतां तुह्मीं कशाला नी कोणाला करणार; पहा, बिचारा गेला मरून आणि तुह्मांला आतां आली आहे उमेद. झालं! अशा रीतीनें बिब्बा घातला ह्मणजे उमेद असली तरी एकीकडे ठेवून गप्प बसणें भाग पडतें. हीच आमच्या ममतेच्या मंडळींची मदत आणि केलेल्याला बक्षीस. अशा रीतिनें आमचेवर घरांतील सर्व लोकांचें प्रेम असल्यावर आमचे दिवस किती सुखानें जातील. व उजाडल्या पासून संध्याकाळपर्यंत करमणूक कशी करावी. अशा स्थितींत दिवसाचा तास होईल कीं, तासाचा दिवस होईल, हा विचार करणें वांचकांवरच सोपवितें. माझ्या सारख्या दुर्दैवी भगिनी बहुतेक कुटुंबांत आहेत. मात्र विचारकरून पाहिलें पाहिजे. आपले घरांत तीची योग्यता कशी ठेविली आहे; मान देतात

किंवा यक:श्चित समजतात; पण या गोष्टी कोणाचे लक्षांत येणार ? बरोबरच आहे.

जलाविण मासा । तळमळे तो कैसा ॥
जावें त्याच्या वंशा । तेव्हां कळे ॥

(तुकाराम)

याप्रमाणें माझी स्थिती आहे. आतां आपल्या मनावर ठसण्यासाठीं थोडीशी माझी हकिगत देऊन माझा हेतु काय आहे, तो वाचकांपुढें ठेवितें.

माझें मूळघर एका खेड्यांत आहे. तेथें मी जन्मतांच माझी आई वारली व माझें पाळण पोषण माझ्या प्रियकर चुलतीनें केलें. माझे वडिल भाऊ तिघे. व मी ही मिळून चौघें परदेशीं झालों. त्या चौघांत माझा बाळंदा माझ्या चुलतीवर पडला. माझ्या चुलतीनें आपलें लहान मुल एकीकडे ठेऊन मला अंगावर घेऊन लहानाची मोठी केली. व तिची मुलगीही माझ्या बरोबरीची असल्यामुळें मी ही माझ्या चुलत बहिणी बरोबर चुलतीला आई या नांवानें हांका मारीत होतें. त्यामुळें बहुतेक लोकांनां मी तिचीच असें वाटे. व मलाही आई ह्मणजे काय हें माहित नसल्यामुळें मला तीच आपली आई असून सर्वांत अधीक वाटे. माझ्या मेलेल्या आईच्या पश्चात् जरी आमचे वडील होते तरी ते आमची विसपूससुद्धां घेत नसत. कारण आई होऊन अधिक प्रेम करणारी सुशील चुलती व बापाहून अधिक प्रेम करणारे सद्गुणी चुलते असतां वासपूस घेण्याची जरूरच राहिली

नाहीं. माझे वडिल बंधु तिघे ह्मणून मागें कळविलेंच आहे. ते जरी फार मोठे नव्हते तरी फार नम्र होते, त्यामुळें घरांतील सर्व मंडळी आमचेवर फारच ममता करीत. त्यांचें मराठी लिहिणें झाल्यावर इंग्रजी शाळेंत घालण्याचा विचार झाला, तोंपर्यंत घरांत इंग्रजी विद्येचा प्रवेश नव्हता. धाकटे चलते जरी इंग्रजी शिकले होते तरी ते फार स्वच्छंदी आणि चैनी असल्या-मुळें घरादाराची काळजी सोडून ते एका शहरांत येऊन राहिले होते. आणि चार पांच बुकां पावेतों इंग्रजी शिकून तेवढ्यावरच ते काम धरून दरमहा शेंपन्नास रुपये मिळवीत. पण आलेला सर्व पैसा ते आपल्या ऐषआरा-माचे व चैनीचे उपयोगीं लावीत. त्यामुळें त्यांचें घर, संसार, बायको, इकडे बिलकूल लक्ष नव्हतें. तरी माझे भावांवर त्यांचें प्रेम अतिशय होतें. व पुढेंही त्यांच्याच विचारानें आमचे बंधूला इंग्रजी शाळेंत घातलें. त्यामुळें आमचे वडिलांनां त्या शहरांमध्यें घर घेणें भाग पडलें, आपलीं मुलें व बंधुचीं मुलें आणि द्वीतीय संबंध केलेली पत्नी लहान असल्यामुळें व आमचे चुलते त्याच शहरीं असल्यामुळें त्यांचीच पत्नी आमचे भावंडांचे रक्ष-णाकरितां आणून ठेविली. हें एक! व दुसरें तिचे पती त्या शहरीं असल्यामुळें मुलांच्या संबंधानें ते घरीं येतील व आपल्या कुटुंबाकडे त्यांचें लक्ष लागेल. पण त्यांचा हेतू ते जिवंत असेपर्यंत सिद्धिला गेला नाहीं. असो, त्यामुळें

आमचे वडील फार दिलगिरी असत. कारण आमचे वडिलांनीं एखादेवेळीं जर कोणतीही गोष्ट काढिली तर ते रागानें चारचार महिनें घरींसुद्धां येत नसत. व खाणावळींत जेवीत; त्यामुळें निरुपायास्तव गप रहावें लागे. आमची काकू जरी पतीचे आचरणामुळें त्रासलेली होती, तरी पण आमचें भावंडांचें खाणेपिणें, जेवणखाण अगदीं व्यवस्थेनें करी. आणि घरांतील सर्व विचार तिच्याच सल्यानें चालला होता. आमच्या वडीलांनीं जरी द्वितीय संबंध केला होता तरी त्यांचें लक्ष मुलांचे विद्याभ्यासाकडे दक्ष असे. त्यांची दुसरी पत्नी ही सुशील व शहाणी होती. ह्मणून जावेच्या मतानें वागत असे. आमचे वडील फार कडक व रागीट होते. त्यामुळें घरांतील सर्व मनुष्यें त्यांना पहातांच लहानापासून थोरापर्यंत थरकांप भीत असत. माझ्या वयाला आठ वर्षें झालीं. तेव्हां ते माझ्या लग्नाविषयीं विचार करूं लागले. खर्चाचे कामांत त्यांचा हात फार आंखूड होता. ह्मणून त्यानीं मला त्यांचे योग्यतेचें घर त्या शहरांत पाहिलें. तें घर जरी त्यावेळीं श्रीमंत नव्हतें, तरी पण होतकरू, सुशील व संभावित होतें. त्यांचे कुटुंब फार नव्हतें. आमचे श्वशूर आपल्याला शास्त्री ह्मणवीत. तेही आपले मुलाचे विद्ये करितां आपला देश सोडून त्या शहरीं येऊन राहिले होते. तेथील हायस्कुलमध्यें त्यांना मास्तराची जागा मिळाली. पुढें कांहीं दिवसांनीं शाळेंत शिकवून उरलेल्या वेळांत ते वैद्यकीय धंदा करीत,

त्यामुळें त्यांचें जाणेयेणें थोरामोठ्यांचे घरांत फार असे. त्या वेळीं डाक्टर लोक फार नव्हते. कदाचित् एखादा डाक्टर असला तरी जुन्या लोकांचा त्यांच्यावर विश्वास नव्हता. कारण डाक्टर ह्मणजे दारू देतात किंवा असुरी उपाय करितात हाच त्यांचे मनाचा ग्रहें. याचें कारण बरोबरच आहे कीं, चारपांच बुका पर्यंत विद्या शिकून मुळ-की परिक्षा पास झाली ह्मणजे दहा मनुष्यांचे पोट भरण्याला कांहीं हरकत नव्हती. आतां विद्यादेवीचें प्राबल्य इतकें वाढलें आहे कीं, वयाला चाळीस वर्षें जरी झाली तरी कालेजांतील परिक्षा संपत नाहीत. पुढें व्हा डाक्टर, वकील किंवा मास्तर आणि भरा कुटुंबाचीं पोटें! तोंपर्यंत चाळीशी लावून आजोबा ह्मणून घेण्याची वेळ येते. दुसर, बुकांचा सुकाळ इतका झाला आहे कीं, रोजनिशि, वर्त-मानपत्रें, लहान लहान बुकें, शिवाय वाग्भटादिक मोठाल्या ग्रंथाचीं भाषांतरें थोडक्या किंमतींत मिळूं लागलीं; मग काय विचारितां? आबाल वृद्धांना सर्व औषधें माहीत झालीं; शिवाय शहरांत दोनतीन डाक्टर! मग बिचाऱ्या नेटीव वैद्यांना विचारतो कोण? पूर्वीची स्थिती तशी नव्हती ह्मणून आमच्या श्वशूरांचा धंदा चांगला चाललेला होता; त्यांचें कुटुंब मोठें नव्हतें ह्मणून मागें सांगितलेंच आहे. ३ मुलगे १ मुलगी २ सुना आणि ते उभयतां. माझे दोघे वडील दीर लहान लहान कामें धरून पुढें परिक्षेचा अभ्यास करीत होते. व त्यांच्या तिसऱ्या चिरंजिवाचें वय

१४ वर्षांचें होतें व त्यांचें मराठी लिहिणें होऊन इंग्रजी तीन चार बुकें झालीं होतीं. त्यांचेच बरोबर माझा विवाह संबंध जुळला. आणि मला तेथें देण्याकरितां थोडा हुंडा ठरविला. पण त्यावेळीं हुंड्यांचें मान इतकें नव्हतें. आतां हुंडा ह्मणजे नवऱ्याची परिक्षा किंवा सासऱ्याचे पगारावर अवलंबून असतो. घरदार, शेतभात, जोडजिनगी, कांहीं असो अगर नसो, हा विचार हुंडा घेणारा किंवा देणारा दोघेही करीत नाहींत, ही मोठ्या आश्चर्याची व खेदाची गोष्ट आहे. असो, याचा विचार पुढें करितां येईल. अजून थोडीसी माझी हकिगत देऊन नंतर याविषयीं माझा जो वाद आहे तो पुढें आणितें. थोडक्याच पैशांतून आमच्या वडिलांनीं उत्तम घर शोधून काढलें; व माझें लग्न ठरलें. माझें लग्न थोडक्यांत आटपल्यावर मला घेऊन सासरची मंडळी परत त्या शहरांत आली. माझ्या सासरची मंडळी सूज्ञ असल्यामुळें मला बिलकूल त्रास झाला नाहीं. घरांत कांहीं असेल नसेल तें सर्व जमाकरून माझ्या अंगावर दीड दोन हजारांचा विषय घातला होता. मी सर्वांत लहान असल्यामुळें मजवर सर्वांची ममता असे; पुढें उत्तरोत्तर माझ्या सासरची पैशासंबंधानें चढतीकळा सुरू झाली. पण माझ्या लग्नास वर्ष दीडवर्ष होतें कीं नाहीं तोंपर्यंत माझी वडील जाऊ बाळंत होऊन वारली. व घरांत मोठा बखेडा उत्पन्न झाला. त्यावेळीं माझी मधली जाऊ पंधरा वर्षांची व मी नऊ वर्षांची

व ३ वर्षांचे दोन मुलगे, व चवदा दिवसांची लहान एक मुलगी; अशा स्थितींत मग आमचे हाल काय विचारतां! तीन मुलें परदेशीं गळ्यांत; त्यांतच आमच्या सासुबाईची स्वतःची एक अडचण होती. दुसरें असें कीं, संसार सांभाळलेली सून बरोबरीची असल्यामुळें दुःख होणें साहजीकच आहे. कारण, ती धर्मनिष्ट व पापभिरू असे. त्या उभयतां सासूबाई मामाजीची सेवा मोठ्या भक्तीनें करीत. भावोजी नेहमीं फिरतीवर असल्यामुळें त्या सर्व दिवसभर देवधर्म व वडिलांची सेवाचाकरी यांत वेळ घालवीत. सासूबाईच्या तळव्याला तूप लावून पाय चुरल्या खेरीज कधींही आपल्या अंथरुणावर त्यांनीं पाय दिला नाहीं. ह्मणून त्यांच्या दुःखाचीं दोन कारणें झालीं. नाहींतर आह्मीं सुना? सास्वेची पूजा ह्मणजे नवऱ्या कडून करवायची. आई तुला घरांत रहाणें असेल तर तिच्या विचारानें रहा. बायकोकडे पाहून हंसत, ही घरांत मालकीण, हिच्या विचाराखेरीज कांहीं कोणाला देतां कामानये; नाहींतर मला बिलकुल कोणाची जरूर नाहीं, मग काय विचारितां? बायको देखत लोकांसमोर आईस बोलतांच, तिचें तोंड सुरू झालें. माझ्या नशिबानेंच सगळें मिळत आहे. पहिलें घरांत काय होतें खेटर? पोट भरण्याचीसुद्धां पंचाईत; आतां यथेच्छ जेऊन चेष्टा व गप्पा आठवतात ह्मातार्‍यांना हवेत कशाला कारभार! झाला पहा चमत्कार कसा तो? जिनें रज्याचे गज केले, दहाजणाचे आर्जव करून विद्या

शिकविली तीं उभयतां परतंत्र. आणि ही आली नशिबाची घरांत. बरोबरच आहे कारण आमचे साधू तुकारामबुवा यांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

अभंग.

माय बापें केली आस । झाला बायकोचा दास ॥

तुकाराम.

असें असून ज्या बाईनें इतके कष्ट केले त्या सासूची इतकी योग्यता मग आमचे सारखी जर घरांत असेल तर तिला कशारीतीनें वागवितील व तिजवर ममता किती करतील हें पाहणें वाचकांवर सोंपवितें. परंतु माझ्या ह्या बोलण्याचा आमच्या बंधूना अथवा भगिनींना राग येईल, तरी विचार केला ह्मणजे राग येण्याची जरूर नाहीं. कारण जो मुलगा तो बाप होतो, आणि जी सून ती सासू होते. याचा अनुभव सर्वांना आहे. तर रागावूं नका विचार करा आणि जर एखादा अवगूण असेल तर सोडून सुधारणा करा. आणि **सीता, अनुसूया, अरुंधती** प्रमाणें कीर्ति मिळवा. व आपले कुटुंबावर ममता ठेवा आणि मीपणा सोडून वागा ह्मणजे सहजच तुह्मांला सुशील व सद्गुणी ह्मणतील. असो. ह्याप्रमाणें आमची जाऊ मेल्यावर बखेडा होणें साहजीकच आहे. तरी आमची मधली जाऊ लहान होती खरी; परंतु ती तिच्याच संगतीनें हुषार झाली होती आणि त्यामुळें थोडक्यांच दिवसांत पुढें सरून संसार संभाळून परदेशी जावेच्या मुलांवर ममता करूं

लागली, व सासूबाईचें दुःख मागें केलें; नंतर आमचे भाऊजी वयानें लहान व होतकरू कामगार असल्यामुळें थोरांमोठ्यांच्या मुली सांगून येऊं लागल्या, मग पुन्हां सासूबाईनां सुनमूख तयार करण्याची वेळ आली व घरांत फारसें नसल्यामुळें माझ्या दागिन्यावर पाळी आली. आधीं बिजवराची बायको, हुंडा देऊन आली व त्यांत सासूबाईच्या माहेराहून ठरलेली मग काय विचारतां, सासूबाईनीं हौसेनें सुनमूख तयार केलें. व माझ्या अंगावरचे सर्व दागिने घेऊन अवश्य लागणारे दोन जिन्नस ठेविले. ते कोणते ह्मणाल तर नथ आणि मंगळसूत्र. असो. याप्रमाणें आह्मांला नवीन जाऊ आली. पुढें मधली जाऊ वाली आणि दोन नवऱ्या घरांत बिजवराच्या; मग आह्मीतर जुन्या पैकीं झालों; असें माझ्या मनांत येऊन माझी सर्व हौस जागच्या जागीं रहात असे; लहान मुलींना असें वाटतें कीं, जगांत भूषण ह्मणजे उत्तम वस्त्र व पुष्कळ दागिने. परंतु खरे दागिनें ह्मणजे निर्लोभ, भूतदया, मृदुभाषण, कलाकौशल्य; हे दागिने ज्याचे अंगांत आहेत तो मनुष्य एकाच देशांत काय तर सर्व देशांत भूषित होतो. परंतु आमच्या लहान वयाच्यावेळीं स्त्रिसमुदायांत विद्यादेवीचा प्रवेश फारसा नसल्यामुळें आह्मांला इतकें ज्ञान कोठून असणार? मात्र येवढें वाटे कीं लोकांचे दागिने अंगावर घालून मिरविणें यांत भूषण नाहीं. जाऊंदे आपले दोन दिवस आहेत

ते, नंतर मी त्याच्याहून अधिक घालीन अशी मनाला फार उमेद येई. जावांवर केव्हांही दुष्टपणा केला नाहीं. गावांत जरी माझें माहेर होतें तरी सासरीं मी आनंदानें असे; मला पाळलेल्या चुलतीला मी आई या नांवानें हांका मारी व माहेरपणाला तिजकडे जात असे. मला बापाचा ळळा नव्हता; मलाच काय पण माझ्या भावालासुद्धां नव्हता. सुटी कधीं येईल व आह्मी दादांचे जवळ कधीं जाऊं ही वाट पहात होतों. मला न्हाण वगैरे आल्यावर पुन्हा खर्च करण्याची पाळी आमचे वडिलांवर आली. खर्चांचे कामांत ते जरा मागें होते ह्मणून सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें गर्भदानांचा खर्च कसा बसा आटपून घेतला. नंतर कांहीं कामाचे बाबतींत त्यांना पांच सहाशें रुपये खर्च पडला. त्यामुळें अथवा कशामुळें ह्मणा! त्यांचें डोकें फिरून भ्रमरवायु झाला व ते अतोनात खर्च करूं लागले. तेव्हां कधींच नाहीं आणि आतां इतका उदारपणा कुठून आला ह्मणून वडिल चुलते ह्मणजे दादा याणीं शोध केला. तेव्हां त्यांना चलबिचल दिसून आली. तेव्हां त्यांनीं मंडळीसहीत वडिलांना घेऊन जाऊन पुष्कळ उपाय केले; पण गूण न येतां उत्तरोत्तर त्यांचें दुखणें वृद्धिंगत झालें, त्यामुळें येथील थोडी मंडळी आपले गांवीं गेली. माझा वडील भाऊ व मातोश्री त्यांचे सुश्रुषेकरितां नेलीं आणि आपले मुलगे जे बरोबर नेले त्याचें कारण इतकेंच कीं, त्यांना इंग्रजी विद्येची

फारशी जरूर नव्हती; त्यांनीं आमचे वडिलांचे आग्रहास्तव पाठविलें होतें इतकेंच कायतें. त्यांची शेतीभाती बरीच पसरल्यामुळें त्या कामांत मुलांना माहिती दिली पाहिजे म्हणून व पुढें आपल्या हातून उत्तरोत्तर होणार नाहीं म्हणून दोन्हीं कारणांनीं शाळा सोडविली; आणि त्यांची तरी विद्या कोठें फार होती? मराठी चार पांच बुकांपर्यंत शिकून तेवढ्यावरच त्या खेड्यांतील त्यांनीं मामलत दहा वर्षें केली. पुढें व्यापार करूं लागले. आणि त्यांतच त्यानीं बरीच इस्टेट केली. व आपल्या वडील मुलाला सर्व माहिती देऊन आपण देव उपासना करूं लागले; ते स्वभावानें फार दयाळू होते. सर्व दानांत अन्न दानाचें फळ विशेष आहे असें समजून ते नेहमीं अन्नदान करीत असत. व घरांत पंक्तीला किती जरी मंडळी आली तरी ते अगदीं गडबडत नव्हते. आपल्या मुला-पासून तों नोकरापर्यंत सारखा जिन्नस वाढीत असत. सन १८७६ त जो दुष्काळ पडला होता, त्यांत त्यांनीं दुष्काळपीडित गरीब लोकांनां आमटी भाकर व आंबील असी सतत चालविली होती; त्यांची ब्राह्मणांवर फार भक्ति असून ते नेहमीं ब्राह्मणभोजनें घालीत. त्यांनीं तीर्थयात्रा, देवधर्म स्वाहाकारादि यज्ञ करून पुष्कळ पैसा खर्च केला. त्यांना पांच मुलगे व तितक्याच मुली होत्या. त्यानीं आपल्या मुली थोरां-मोठ्यांच्या घरीं दिल्या नव्हत्या; मात्र नामांकित व कुलीन घरें पाहून त्यानीं मोठ्यांच्या मुली

केल्या. आपल्या वडील मुलाला व्यापाराची माहिती देऊ दुसरीं मुलें त्यांनीं इंग्रजी शाळेंत घातलीं. व तींही पुढें विद्वान होऊन कामें करूं लागलीं. एक मुलगा उमरावतीस होता, बाकीचे जवळच आजूबाजूस होते. त्यांच्या कुटुंबांत विभक्तपणा मुळीं नव्हता. आमचे मधल्या चुलत्याचीही विद्या तितकीच होती व थोडी शेती-भाती, व्यापार, आणि मोठा लांकडांचा कारखाना त्याच गावांत असल्यामुळें ते उभयतां एकत्र होते. आणि आमचे वडिलांचे आजारामुळें आमचीही मंडळी तेथें होती. आमच्या दुसऱ्या मातोश्रीला ४।५ मुलें झालीं, परंतु एकही राहिलें नाहीं. नंतर वडिलांचें दुखणें अधिक होऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. त्यावेळीं आमची मातोश्री सहा महिन्याची गरोदर होती. तो मुलगा वांचला व तो आह्मां सर्वांना प्रिय वाटतो आणि मातोश्री पती मागें आपल्या सावत्र मुलांवर अतिशय प्रेम करून माझे भाऊही तिला मान देत असत. माझा वडील भाऊ त्या खेड्यांतील वकिली करून मळे दळ्यांच्या उद्योगांत असे. आणि दुसरा इंजिनियर आणि एक वकील आहे. व धाकटा शिकतो आहे. आमचे धाकटे चुलते स्वच्छंदी होते असें मागें सांगितलेंच आहे; परंतु माझे वडील वारल्यानंतर त्यांनीं मनावर घेऊन विद्यार्थी मुलांचे हाल न करितां घर बांधून आपल्या बायकोला आणून आपली चैन मागें सारून माझ्या भावाचे कुटुंबास जवळ ठेऊनघेऊन संसारसुख घेऊं

झगले, आणि त्यांनीही १०।२० हजारांची इस्टेट मिळविली वाचकहो, माझे माहेरची श्रीमंती होती व सासरची गरीबी होती असें समजूं नका. कारण त्यांची जमीन-जुमला, व्यापार जरी नव्हता, तरी मिळकत पुष्कळ होती, ह्मणजे आमचे थोरले भावोजी मामलेदार आणि दुसरे वकील ह्मणजे नांवचे नव्हते, तर सर्व वकिलांत पुढारी व मानस्त होते. आमच्या माहेरची व सासरची अशी जरी श्रीमंती होती तरी उभयतां आह्मीं श्रीमंतीला अलिप्त होतों अथवा दिवस पोचले नाहींत ह्मटलें तरी चालेल; कारण माझ्या वयाला १९ वर्षें होतांच एक मुलगी झाली. आणि मुलगी दहा महिन्याची होतांच माझ्या सर्व सुखाचा शेवट झाला. व मी पक्की दुर्दैवी बनलें. आमचे उभयतांचे वयाला अंतर ४।९ वर्षांचें होतें. आणि तितक्यांत विद्या होऊन पैसे ते काय मिळणार ? तरी विद्येचे नावानें ९।२९ रु० खर्च होऊन अभ्यास सुरू असला ह्मणजे सर्वांना उमेद व कौतुक असतें; तशी आमची स्थिति नव्हती. त्यांनीं आपल्या हातून अभ्यास होत नाहीं ह्मणून विद्याभ्यास सोडून वॉच नीट करण्याचा धंदा चाल-विला होता. त्यांत २९।३० रुपये मिळत, परंतु तेही घरांत येत नसत. हें एक कारण, व अभ्यास सोडला हें दुसरें या दोन्ही कारणासाठीं घरांतील सर्वांचा आमच्या-वर राग असे. व माझ्यापुढें त्यांना सर्व बोलत, तें मला फार वाईट वाटे; परंतु उपयोग काय ? मी फार लहान असल्यामुळें

मला त्यांच्याशीं फारसें बोलण्यास धीर होत नसे; तरी एखादेवेळ दोन शब्द सांगत असे त्यावर उत्तर मिळे कीं, होय खरें तें; या तारखेपासून पैन पै रक्कम जमा करून घरांत आणून देतों मग तरी झालें ना? तें मला अगदीं खरखरं वाटत असे व सासचाईना त्याचप्रमाणें उत्तर मिळे, परंतु तारीखेस व शब्दाला जुळत नसे तरी मला तें खरें वाटे; कारण आपल्या प्रीतीचे मनुष्यानें आपल्याजवळ किती जरी गप्पा ठोकल्या आणि वारंवार खोट्या होत असल्या तरी सांगितलेल्या वेळेला त्या आपल्याला अगदीं खऱ्या वाटतात. त्याप्रमाणें मला अगदीं खरें वाटे. पण घरांतील मंडळी बोलली ह्मणजे वाईट वाटे, परंतु उपाय नाहीं. अशा रीतीनें आमचें वर्तन असल्यामुळें घरांतील मंडळींचें प्रेम तें आमच्यावर किती असणार? मात्र आमचें उभयतांचे मन अगदीं एक असल्यामुळें मला घरांतील मनुष्यांची फारशी फिकीर वाटत नसे. जाउंदे, आपले दोन दिवस आहेत, असें वाटून मी आनदांत असे; परंतु तें तरी माझ्या दुर्दैवाला कुठें पत्करिलें? दोन दिवस ताप येऊन त्यांच्यावर मृत्यूनें घाला घातला. मग काय? मी जें कांहीं नेहमी मनांत ह्मणे, कीं दोन दिवस आपले आहेत जाउं दे. त्याप्रमाणें माझे सुखाचे दोन दिवस संपले आणि मी अक्षयी दुर्दैवाची नवरी होऊन राहिलें; परंतु मनांत वाटे कीं, ज्या घरांत आपण सर्वांना अधिक वाटत होतों तेथेंच आतां जन्म काढण्याची वेळ आली. ह्मणून फार वाईट

वाटे पण उपयोग काय? वय लहान व पोरगी एक. ह्मणून कुठें जाणार! व काय करणार!! मला नंतर माहेरीं नेली, पण मला तेथें रहाणें बरं वाटेना, कारण माहेरीं आई ना बाप. सर्व जन्म दुसऱ्यावर अवलंबून मग कोणावर तरी अवलंबून राहूं? मात्र सासरीं राहिल्यापासून माहेरच्यांना व आपल्याला अधिक भूषण असें वाटल्यावरून मी सासरीं येऊन राहिलें. जो आमचे लोकांत सोंवळी करण्याचा धर्म माजवून ठेविला आहे, तो एकदांचा उरकून घेतला. त्यामुळें आमचें घर पवित्र मानलें गेलें. धर्मामधील सर्व बाकीचे नियम आमचे विद्वान बंधू आणि वेदमूर्ति ब्राह्मण विसरले गेले. मात्र हा धर्म त्यानीं पक्का ध्यानांत ठेविला आहे. परंतु मला नियम माहीत आहेत. तिनें एक धान्य खावें. भूमिवर शयन करावें. पांढरें नेसावें. जसें काळें वर्ज तसें तांबडें वर्ज. असे धर्मामधील नेम अनेक आहेत. आपले मुलाखेरीज इतरांशीं बोलूं नये, आणि पोटभर जेऊं नये; कारण पोटभर जेवण व आंगभर वस्त्र मिळालें ह्मणजे तिला अनेक सुखांची इच्छा होते. ह्मणून अल्प आहार व पांढरें वस्त्र नेसून रहावें. व आत्महत्या होऊं नये ह्मणून जिवाचें रक्षण करावें. तांबडी चंद्रकळा अथवा अलवान नेसण्याला कुठेंही सांगितलीं नाहींत. अशारीतीनें जिला रहाणें असेल तिनें रहावें. किंवा सती जावें असा नेम पूर्वीं दत्तात्रयानीं सांगितला होता; त्याच्या हाताचा हा नेम मुळींच नव्हता. हल्लीं हा धर्म स्थापन करणाऱ्या ब्राह्मणानीं

सर्व नेम सोडून हा एकच नेम अमलांत आणिला आहे. घरांत सकेशाबाई असली, कीं केली भटांनीं निंदेला सुरवात. आणि तिला कोणी शिवूं नये. तिचें पाणीसुद्धां कोणी घेऊं नये. ह्मणजे तिला शूद्रिणीप्रमाणें वागवितात; बरं हा नेम जर प्राचीन ह्मणावा तर नैषध राजाच्या **सिमंतिणीचा चित्रांगद** यमुनेंत बुडाला तेव्हां ती सकेशा राहून श्री शिवाराधना करीत होती, त्यावेळीं मोठमोठाले महान तपस्वी ऋषी असून हा नेम कसा विसरले? आणि तिच्या केंसाच्या थेंबानीं त्याला पाताळांत कसा नर्कवास प्राप्त झाला नाहीं? ते ऋषी राजाच्या आश्रयाखालीं असल्यामुळें गप्प होते ह्मणावं तर ते बसल्या ठिकाणीं अन्न व अग्नि उत्पन्न करीत. ह्मणून त्यांना राजाश्रयाची जरूर नव्हती. आणि त्याना वेदपठणांमुळें फावत नसे. आतां नांवाचे वेदमूर्ति; त्यांचा धंदा ह्मटला ह्मणजे पक्वान्न खाऊन स्वयंपाकाची, दक्षिणेची नाहींतर लोकांच्या क्षुल्लक गोष्टीची निंदा करीत वेश्यांच्या कट्ट्यांवर चंची सोडून तंबाखू चोळीत बसल्याखेरीज दुसरा उद्योग थोडाच. आतां सर्वच तसे असतील असें मी ह्मणत नाहीं. परंतु–

अभंग

बोले तैसा चाले ॥ त्याचीं वंदावीं पाऊलें ॥

तुकाराम

असे भट तुह्मीं भटांकडूनच शोधून आणवा. किती

मिळतात पाहूं. माझें मत धर्माविरूद्ध वागण्याचें बिलकूल नाहीं. मात्र मी येवढेंच ह्मणतें कीं, प्राचिन सर्व नियम सोडून कलियुगांत एकच नेम अमलांत आणल्यापासून नवऱ्याला सुगती व स्वकुलाचा उद्धार होत असेल तर आह्मीं कबूल आहोंत; मात्र चालू आहे हा नेम सोडून दुसरा एखादा नेम चालू ठेवा; कारण या नेमापासून पातिव्रत्यपणांत नांव गाडलें गेलें, असें मात्र समजूं नका. आणि मीही याविषयीं अधिक उल्लेख करीत नाहीं. कारण जगांत काय चाललें आहे तें तुह्मीं पहातांच आहां. माझें मन सुधारू लोकांत नाहीं. परंतु हल्लीं लहान लहान मुलींवर वारंवार असे प्रसंग येऊं लागले तर त्यांचे अंगांत दुर्दर्शितपणा किती असणार? वाईट प्रसंग येण्याचा संभव आहे. हें एक. दुसरें असें कीं, तुह्मीच पहा, आपले घरांत स्नेहाशीं किंवा बाळमित्राशीं जर आह्मीं बोललों तर घरांतील मनुष्यें पुटपुट करीतात कीं काय बाईतरी दिवसांदिवस माणसानें ताळ सोडिला. परवां नुक्ती अशी झाली आणि त्यांच्याशीं खुशाल बोलत बसली. आपण तर्णीताटी मुलगी; कशाला त्यांच्याशीं बोलावं? पण मी विच्यारितें तुमची तर्णीताटी मुलगी एखाद्या नीच जातीच्या हलकट मनुष्यावर एकीकडे महिना पंधरा दिवसांनी कसे विसंबता? या तुमच्या धेडगुजरी बद्दल मला मोठें हसूं येतें.

वरि वरि भगवा झाला नाम । अंतरीं वश केला काम ॥
तया ह्मणूंनयें साधू । जगीं विटंबना बाधू ॥ २ ॥

(मुक्तेश्वर.)

याचप्रमाणें स्थिती आहे; तर जी बायको पतिव्रता धर्मानें वागणार ती पलंगावर निजो अथवा अलंकार घालो अंतःकरणा पासून जी शुद्ध आहे तिला तुमचे नियम बिलकूल लागू नाहींत. नाहींतर अशा बायका इतक्या आहेत, कीं अक्षयीं वेदांत भाषण करून व देवळांत जाऊन पुराण ऐकणाऱ्या मोजतां येणार नाहींत. त्यासाठीं ह्मणतें कीं हा अवीट व अमंगळ धर्म सोडा आणि जी गोष्ट एकवेळ केली ती पुन्हां करण्याचा प्रसंग येऊं नये असा एखादा नियम शोधून काढा. व आपल्या विद्वान भगिनी कडून वाईट गोष्ट न होण्या सारखे कांहीं तरी उपाय करवा-ह्मणजे जगांतील अर्धा अधर्म कमी होईल. मला या गोष्टीचा मोठा त्रास आहे. पण उपाय काय? कारण आपलें जिणें ह्मणजे सर्व लोकांवर अवलंबून आहे. ह्मणून त्याप्रमाणें वागणें भाग पडतें, कारण जवळ पैसा नाहीं. माहेरचीं व सासरचीं नामांकित आणि मला जर त्या ठिकाणीं राहणे भाग तर त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे. त्यांत दोन प्रकार आहेत. जवळ जर पैसा असेल तर तिला कोणी तरी वचकतें व थोडे थोडे तिच्या मत्तानें वागतात मग आह्मांला कोण विचारणार? माझ्या दागिन्याची व्यवस्था

व आमच्या पैशाचा निकाल वाचकांना मागें सांगितलाच आहे. त्याप्रमाणें आह्मीं एकदांच कफल्लक होऊन पराधीन झालों, तरी आमचे घरची मंडळी सुशील असल्यामुळें मला त्रास झाला नाहीं. माझ्या मुलीला कोणत्याही गोष्टीची कमतरता पडूं दिली नाहीं. ती उपवर होतांच आपल्या योग्यतेप्रमाणें व मला समाधान होण्यासारखें तिला उत्तम घर पाहून मोठ्या समारंभानें तिचें लग्न केलें; माझ्या मुलीचा सर्व बोजा कायतो मधल्या भावोजींवरच पडला. कारण त्यांना दुसऱ्या बायको पासून मुलबाळ कांहीं झालें नव्हतें. पहिल्या बायकोची एक मुलगी होती, येवढेंच कायतें अपत्य. ती मुलगी फारच सद्गुणी व समंजस होती. माझे वडील दीर नेहमीं खेडींपाडीं हिंडण्याच्या व बदलीच्या गोंधळांत असल्यामुळें त्यांच्या मुलाचींसुद्धां बहुतेक कार्यें यांचे हातून झालीं. त्यांत मधल्या जावेला मुलबाळ नसल्यामुळें, आमच्या मुलींचें वरचेवर देणेंघेणें, पुढें होऊन भावोजी अत्यंत उत्सुकतेनें करीत असत. जणूंकाय आपले मुलींपेक्षां कांकणभर जास्त केलें, परंतु कमी केलें नाहीं. असो; याप्रमाणें आमची सर्व व्यवस्था ठीक चालली होती. पण मला त्यापासून फारच मिणद्पणा वाटत असे कारण माझेकडे त्यांना उतराई करण्याजोगें कांहींच कसें साधन नाहीं ह्मणून फार वाईट वाटे. व क्षणांत वाटे काय झालं केलं ह्मणून! वडील जावेच्या मुलाचें नाहींका केलं? मग माझं तरी कोणी नाहींच करणार! व लगेच वाटे कीं, छिः काय जिणें, आपला सर्व जन्म

लोकांवर अवलंबून ! एका पैशासाठीं किंवा एका लुगड्या-साठीं लोकांचे तोंडाकडे बघावें लागतें. माहेरच्या व सास-रच्या कुटुंबांत मी एकटीच कशी दुर्भागी जन्मलें? **एका काडीची सत्ता नाहीं, नि दमडीची जिनगी नाहीं.** मग मला चांगुलपणा तो कुठून येणार? त्यांत माझ्या मुलीचें जावांनीं केलें; हे उपकार माझ्या लोकीवर असतांना उलट लुगड्यासाठींही नेहमी त्यांचेजवळ आगांतुकी आहेच. पण करता काय इलाज नाहीं; ह्मणून मला लुगडें माग-ण्याची वेळ आली ह्मणजे प्राणावर येई, हें माझें सांगणें वाचकांना खरें वाटणार नाहीं. पण माझ्यासारखी जिची स्थिती असेल, तिलाच खरें वाटेल. असो; या स्थितीबद्दल मला फार वाईट वाटे व नेहमी मनांत घोळे कीं, मोठ्या घराण्यांतल्या मुलींवर लहानपणी जरी वाईट प्रसंग आले तरी इतकी कंगाल स्थिती असणें ह्मणजे फारच वाईट. **ह्मणून तिच्याजवळ थोडा बहुत सत्तेचा पैसा पाहिजे. हा विचार मुलीचे बापानें करावा. कारण जरी तिचे दागिनें असले तरी तिची दागिन्यावर सत्ता नसते.** व सत्ता येण्याला फारच गोंधळ पडतो. ह्मणून हुंडा देतेवळीं **निदान थोडीतरी रकम** जर मुलीचे नांवानें दिली, तर पैसा शिल्लक राहील, घेणाराचा लोभ कमी होईल. व देणाऱ्यांचे मुलींचें कल्याण होईल; असें नेहमीं मला वाटत असे. परंतु उप-योग काय ह्मणून मी गप्पच होतें; तरी मी नेहमी भावांचे बरो-बर वाद घालत असे कीं, पुढें तरी सुधारणा करावी, व मुलींवर

असे प्रसंग येऊं देऊं नये. कारण आपल्या घरांत सर्वांची स्थिती चांगली असून एकीनेच येवढें कसें दीन व्हावें! यापेक्षां एखाद्या गरीबाचे घरीं जरी जन्म झाला तरी बरें. कारण कावळा आपले मेळ्यांत बसला ह्मणजे त्याला आपण वाईट आहों हें बिलकूल समजत नाहीं पण राजहंसांत बसण्याची वेळ आली ह्मणजे आपले अमंगळ स्थितीचें त्याला फार वाईट वाटतें. व जनालाही शंका वाटते कीं, राजहंसांत कावळा कुठून आला? ह्याप्रमाणें स्थिती असते. मलामात्र सर्व मंडळी चांगलें करीत. मी बहुतेक सासरींच असे. माहेरीं केव्हां तरी जात येत असे. माझे-सखे भाऊ व चुलतभाऊ मजवर फार ममता करीत. माझा एक चुलतभाऊ गीरणीवर उमरावतीस आहे ह्मणून मागें सांगितलेंच आहे; तिकडे आमची मंडळी वारंवार जातयेत असत. बहुतेक मे महिन्यांत जात आणि आईही जातेवेळीं मला फार आग्रह करी कीं, चल एक महिनाभर राहूं, व मुलांचेच बरोबर येऊं! पण मी नेहमीं टाळाटाळी करी कीं काय ह्मणून हात हालवीत जावं! गेल्यासारखें एखादी भाऊजयीला चोळी शिवेन ह्मणजे कांहीं नाहीं उलट आपला जाण्यायेण्याचा २०। २५ रुपये खर्च त्यांचेवर घालावा, व गेल्यावर ते कांहीं-तरी एखादें लुगडें देणार! मग कारणाखेरीज रिकामा खर्च दुसऱ्यावर कां घालावा? मी कांहींतरी सबब सांगे व आई

ह्मणे मर्जी तुझी, एक किंवा दोन वर्षांनीं उमरावतीचा भाऊही इकडे येतो. केव्हां केव्हां पत्रेंही येतात. त्यांच्या चवध्या पांच मुलींमध्यें एकीलाही लिहिणें वाचणें, येत नव्हतें. मीच सासरीं गेल्यावर चार अक्षरें शिकलें, त्यामुळें माझे भावांना मोठं कौतुक वाटे. व उमरावतीचा भाऊ ह्मणून दाखवी कीं, मला मोठी हौस आहे कीं, आपण बहिणीला पत्रें लिहावीं, व तिनें त्यांचीं उत्तरें पाठवावीं. त्याप्रमाणें मी त्याला पत्र पाठविल्याबरोबर सर्वांचे आधीं तो मला उत्तर पाठवी. उमरावतीचे भावाहून एक लहान भाऊ आहे. त्याचें नांव **गणपती**. त्याची २४ सावे वर्षीं एल. एल. बी. ची परिक्षा पास झाली. व तो घरीं येऊन, एक महिना स्वस्थ राहिला; नंतर तो कंटाळला, कारण नेहमीं त्याला शहरांत राहण्याची संवय; त्याला खेड्यांत कुठून चैन पडणार! मी तिथं एक महिनाभर राहण्याकरितां गेलें होतें. एकेदिवशीं तो माझ्या बरोबर बोलतां बोलतां ह्मणाला कीं मला दोन महिने कुठं तरी जावेंसें वाटतें आहे. मीही थट्टेनें ह्मटलें कीं चल मलासुद्धां कंटाळा आला आहे; उमरावतीला बापूकडे जाऊया. तुलाही आतां मुंबईला जाण्याची गडबड नाहीं. मात्र फार दिवस राहिला नाहींस तर मी येतें. झालं; एवढें त्याला पुरे; तो लगेच ह्मणाला कीं हें खरें आहे ना? माझी उद्यां तयारी आहे. चल तर आतां. बोलणें फिरवितां कामानये. आईला हांक मारून, ऐकलंस का आई, उद्यां माझ्र्मरावतीला निघणार. व माझ्या बरोबर

मनुताई सुद्धां येणार; अगदीं ठरलं. आई ह्मणाली मनूचं ठरलं खरं, परंतु मला नाहीं खरं वाटत. मी जातेवेळीं किती तरी आग्रह केला. बापूचें सुद्धां पत्र तिला आलें. जावं हें चांगलं. आपलीं आहेत ह्मणून बोलावतात, तुला तरी कुठं जाणं ना येणं; त्यालाही बरं वाटेल. लगेच मी ह्मटलें नको बाई. भाऊजी कांहींतरी ह्मणतील. तो म्हणला ती काळजी तूं अगदीं करूं नको, मी विचारून येतों. झालं दुसऱ्या दिवशीं पाहटे विचारून आला; मग माझं काय चालतें. मुकाट्यानें जाण्याची वेळ आली. दुसरे दिवशीं मेलच्या गाडीला निघतेवेळीं वाटेंत सांगण्यासारखें कांहीं घेतलें नव्हतें; मात्र आईनें **गणपती**साठीं पुऱ्या, श्रीखंड, बाकीचें थोडें थोडें फराळाचें व फळफळावळ दिली होती. नंतर आह्मीं वाटेनें **मुंबईस** मात्र उतरून एके स्नेहाचे घरीं जेवण केलें. पुन्हां कांहीं फळफळावळ घेऊन निघालों ते थेट उमरावती येईपर्यंत उतरलों नाहीं. तेथें ४ वाजतां गाडी स्टेशनावर पोहोंचली. गाडी थांब-तांच प्रेस मधून आलेला शिपाई आमचा शोध करीत उभा आहे; **गणपतीनें** त्याला पहातांच हाक मारिली. तों लगेच त्यानें येऊन सामान उचललें. टांगा पाहून ठेवलाच होता. मी आपली शाल घेतली व त्यानीं आपली मनीब्याग गळ्यांत घातली; शिपाई सामान घेऊन पुढें चालला. त्याचे मागून आह्मीं इकडे तिकडे न पहातां गाडींत येऊन बसलों. तो दिवस रविवाराचा अस-

त्यामुळें रस्त्यांत दाटी फार होती ह्मणून मार्केटांतील देखावा, जाणायेणारे लोक व इमारती पहात पहात आमची गाडी अगदीं सावकाश नेण्याला सांगितली होती; आह्मांला घरीं येण्याला फार वेळ लागला ह्मणून बापू बायकोजवळ म्हणत होता कीं, स्टेशनावरून गाड्या आल्या पण आमची गाडी अजून कशी आली नाहीं व शिपाई सुद्धां कसा आला नाहीं? बरोबर सहा वाजले. इतकें बोलत आहेत तों आमची गाडी उभी राहिली. दरवाज्यापुढें एक लहानसा बाग करून फुलझाडें वगैरे लावून राहुटी-मध्यें ४ खुर्च्या २ कोच टाकले होते. व आपण एका इझिचेअरवर अतिशय उकाडा होत असल्यामुळें मल-मली सद्रा घालून वर्तमानपत्र वाचीत पडला होता. गाडी थांबलेला आवाज ऐकतांच एका हातांत वर्तमानपत्र व एका हातानें डोकें खाजवीत बाहेर आला व आह्माला पहातांच गाडीजवळ येऊन हंसत ह्मणाला, मला वाटलं कीं आज तुह्मीं येत नाहीं. गाडी तर केव्हांच आली. **गणपती** ह्मणाला तें खरं, बाजारामुळें पेठा, दुकानें, मार्केट पहात पहात सावकाश गाडी आणली दुसरें काय. त्याची बायको जवळच होती; तिनें मला पाहतांच एकदम पाण्याचा तांब्या पुढें ठेविला व आंत या ह्मणाली. तो लगेच बायकोकडे पाहून बापू ह्मणाला, या कशाला? लवकर स्वयंपाक होउंद्या. ती उपाशी आहे, असें ह्मणून त्यानें माझा हात धरून मला कोचावर बसवून

आपण जवळ बसला. व मला ह्मणाला मनुताई तुलामात्र फार भूक लागली असेल. गणूनें दशमी लाडू खाल्ले असतील. तूं काय खालेस? मी ह्मणालें मी सुद्धां पुष्कळ खालं. आईनं बदामाच्या वड्या व खसखशीचे लाडू दिले होते. शिवाय यांच्या चहाच्या ष्टोववर दूध तापवून घेत होतें; व प्रत्येक स्टेशनावर नवीन फळफळावळ व गोमांतकी, अपूस, पायरीचे आंबे घेत होतें; आणखी तुला सुद्धां आणले आहेत. पण **दामोदर** ( बापूचा मुलगा ) कुठें आहे? इतक्यांत शिपाई त्याला घेऊन आला. त्याला पहातांच म्हणतो पाहिलेंस का, आत्याबाई आल्या आहेत, आईनं तुला पुष्कळ खाऊ पाठविला आहे. ते कोण ह्मणतांच तो ह्मणाला गणूकाका? ही नव्हे आत्याबाई आमची; दुसरी आहे. ह्मणजे आई जातेवेळीं धाकटी बहीण नेत होती. तीच त्याला माहित. इतकं आमचं बोलणं चाललं आहे तों आंतून बर्दी आली; वन्सं उठा, आंग धुवा, स्वयंपाक झाला; इतकें म्हणतांच आह्मीं उठलों व आपापले उद्योगाला गेलों. जेवणं, खाणं, झाल्यावर पुन्हा बापू ह्मणाला, मनूताई, येतेसना बाहेर. तशी वहिनी लगेच ह्मणाली कीं, वन्सं आमचं तुमचं थोडं नातं आहे बरं का! इथं बसलां तरी कांहीं हरकत नाहीं. तों लगेच **गणपती** ह्मणाला वयनींचें जेवण होईतोंपर्यंत बसुंदेत तिथं. दोघे गेल्यावर बराच वेळ आमच्या गोष्टी झाल्यावर मी बाहेर गेलें व ह्मणालें **गणपती** नीज आतां जाग्रण रात्रीं झालं आहे. बापू ह्मणाला ( बायकोकडे

पाहून ) खरंच तें; ऊठ, आह्मी दोघें वर निजूं, ह्मणून दामोदरला घेऊन वर गेले. शास्त्रीतांचें काम आटपतांच आह्मी खिडक्या दरवाजे बंद करून निजलों. दुसरे दिवशीं सकाळीं आपले उद्योग आटपल्यावर मुलगे चहा घेत होते तेथें मी बसलें होतें. इतक्यांत मागल्या चौकांत कसलासा तंटा ऐकूं येऊं लागला. ह्मणून मी विचारिलें, हें काय? तोंडें कोणाचीं ऐकूं येतात? तो ह्मणाला, तें कांहीं विचारूं नको. आह्मांला जे स्नेही गांठ पडले आहेत ते अगदीं शिक्षण घेण्यासारखे आहेत. इतकें ह्मणतांच कोणीलोक बाहेर आले ह्मणून तो निघून गेला. मग मला आंतून सर्व पत्ता लागला. ती हकीगत पुढें देतें. बापू राहत असलेला वाडा फार मोठा होता ह्मणून अर्धा वाडा यांच्या जवळ होता व अर्ध्या वाड्यांत कोणी मोठे कामगार होते. त्यांना २००।२९० रुपये पगार होता. त्यांचे घरांत मंडळी फार नव्हती. शंभुराव, त्यांची बायको पार्वतीबाई, त्यांची आई व आजी, एक विधवा भिकी या नांवाची बहीण आणि दोन मुलें, इतकीच मंडळी असून पगार एवढा मोठा; परंतु घरांत नेहमी तंटा. शंभुरावाचा एक वडील भाऊ होता, पण तो गरीब असल्यामुळें लांब असे; आजी पहिल्यापासून यांचेचजवळ होती व बहीणीचा नवरा मरून सासरची वाताहात झाल्यामुळें ती यांचेचजवळ होती. पार्वतीबाई ही दुसरी बायको असून, लाडकी; ती करील ती पूर्वदिशा. सासू व नणंद तिला नद्रेपुढें सुद्ध नको होती.

कारण ती माहेरचें कोणी तरी आणून ठेवण्याचा बेत करीत होती. आपण नवऱ्याला ह्मणून दाखवी कीं, तुमचीं मनुष्यें तुह्माला पाहिजेत मला नको का माझीं? माझं इथं कोण काळजीचं; मला काय उपकार; तुमच्या मनुष्यासाठीं मला इथं राबावं लागतं. पण हा बिचारा कर्तोकाय आईला व बहिणीला कुठं घालवील? बहिणीचे सासरीं तरी कांहीं नाहीं. भावाकडे घालवावी तर त्यांची मिळकत थोडी ह्मणून ते बायकोचं बोलणं सोशीत व तिला ह्मणत तुमचीही मंडळी आणा, त्यांत काय आहे! पत्र घाल; मी नको कुठं ह्मणतों. शंभुरावाची बहीण भिकू हिचा आणि पार्वतीबाईचा नेहमी तंटा. कितीजरी भिकूनें काम केलें व कसें जरी केलें तरी हिच्या मनास ह्मणून येतनसे. मी ह्मणून तुह्मांला संभाळली, तुह्मीं माझ्या घरीं बरोबर काम करीत नाहीं; माझ्या मुलांबरोबर दुष्टपणा करितां, मूल तुमच्यानं बघवत नाहीं; असें ती उलट ह्मणतअसे. बरं असं ह्मणते ह्मणून ती मुलाना घेई व तिला थोडथोडीं औषधें माहीत होतीं, तीं केव्हां केव्हां आपल्या विचारानें घालीत असे. पण पार्वतीबाईची मर्जी बिघडली कीं झालं. कसलं औषध घातलंन कोणाला ठाऊक! माझें पोर बिघडून वाळून गेलं; पोर मजकडे सुद्धां येतनाहीं. काय औषध घातलंन कीं काय ओंवाळून टाकलंन कीं काय चटुक केलन. नाहींग बाई मी आतां हिचं औषध घालणार, गांवचे वैद्य कांहीं मेले नाहींत. कुणी ह्मटलें

कीं अहो तुह्मांला मूलबाळ संभाळण्याला मनुष्य मिळत नाहींका? कीं झाली सुरवात. मी कोणा हव्या त्यांच्याकडून करून घेईन; शेजाऱ्यापाजाऱ्याकडून करून घेईन, त्यांचे उपकार फेडीन. पैसा टाकल्यावर कोण हवें तें करील. ही गेली तर आह्मीं उपाशींच कीं नाहीं. असली असल्यापेक्षां नसलेली बरी. सदासर्वदां ह्या बोल ण्यामुळें बिचारी भिकी कंटाळून गेली. परंतु करते काय; व जाते कुठं. अशा स्थितींतच तिला दुखणें आलें. मग काय विचारितां; पार्वतीबाईचे हातून काम होईनासें झालें, व भिकीच्या उपासावर येऊन टेपलें. आपल्या हातून काम होत नाहीं तर उपास कशाला करावेत? आणि दुखण्यानें पडावें? हीच दुखण्याची सुश्रुशा; भिकी आपल्या हातून होईल तें काम करून पडून राही; गावांतच तिची चुलत मावशी होती, ती फार गरीब होती. ती केव्हां केव्हां इचेकडे येत असे. ती सहज आली, व भिकूची अशी दुर्दशा पाहून तिला ह्मणाली मजकडे चल. आणि बरी झालीस ह्मणजे ये. कां पार्वतीबाई हिला नेतें मी आठ दिवस. त्याकीं मला काय विचारतां? मी कोण घरांतली? बरं, हिच लुगडं तरी कुठं आहे? मला नाहीं माहित, विचारा नि न्या शोधून. पार्वतीबाईचा स्वभाव मावशीना माहीत होता, ह्मणून शंभुराव बसलेल्या माडीवर गेल्या व त्यांना विचारून भिकूला घेऊन गेल्या. भीकीही जातेवेळीं वयनीला विचारून गेली नाहीं. मग काय, हिला सांपडलं. मला विचारल्या खेरीज गेली. आतां घरांत

कशी येते पाहूं! भिकी मावशीकडे गेल्यावर लौकर बरी झाली व मावशीला ह्मणाली मी जातें. मावशी ह्मणाली तुला मी इतकी आजारी आणली असतां पार्वतीचा एक निरोप नाहीं, व शंभूराव इकडे फिरकले नाहींत; पाहूं बोलावतात कीं नाहीं स्वस्थ रहा. भिकू मावशीकडे गेल्यावर घरीं फार हाल झाले, मुलगी फार आजारी पडली, व ब्राह्मण सोडून गेला. दुसरें ठेविले तरी महिनाभर टिकेनात, शंभुरावाचे जेवणाचे सुद्धां फार हाल होऊं लागले; पण बायकोचे विचाराशिवाय बोलावणं धाडतात कसें? व हिचा तरी निश्चय प्राण गेलातरी भिकीला आणणार नाहीं. मावशीचा नियम बोलावल्याखेरीज पाठविणार नाहीं. झाले हाल कुणाचे? भिकीचे. तिच्या लुगड्याच्या अगदीं वत्त्या उडाल्या ह्मणून तिनें शंभुरावाकडे निरोप पाठविण्याचा विचार केला. परंतु वहिनी काय हवें तें बोलतील ह्मणून तिनें वहिनीकडे एका मुला बरोबर निरोप पाठविला कीं, लुगडीं अगदीं फाटलीं ह्मणून दादांना सांगून घेऊन दे. हा निरोप ऐकतांच, हं ये ह्मणावं आतां नि घे ह्मणावं लुगडीं. पुरुष घेऊन देतात कसे बघतें, मावशीकडे राबून खाते नी मजकडे लुगडीं मागते. पडलाय माझा खोळंबा! पाहूं आतां कशी लुगडीं नेसतेती? झालं सर्व उपाय थकला नी मावशीजवळ किती दिवस रहाणार, ह्मणून भिकूनें वडील भावाकडे जाण्याचा निश्चय केला. आजीला सांगून पाठविलें कीं, मी भावाकडे जाणार तूं येणार तर ये.

आजीनें शंभूरावाला विचारिलें कीं भिकू भावाकडे जाती आहे मीही तिजबरोबर जातें. हें ऐकतांच शंभूराव गडबडले कीं अशा स्थितींत भिकी नी आजि जर तिकडे गेलीं तर भाऊ मला काय ह्मणतील! असा विचार करून बायकोला न विचारतां आपण स्वतः जाऊन भिकूला घेऊन आले. भिकू घरीं आल्याबरोबर पहिल्याप्रमाण कामधंदा करूं लागली. आपल्या मत्ताखेरीज बहिणीला आणली ह्मणून पार्वतीबाईचे अंगाची आग होत असे. ती भांडणाची वाट पहात होती एकवेळ भिकूचं नी आजीचं बोलणं चाललं होतं; तें हिनें ऐकल्या बरोबर ती वाघिणी सारखी चौताळून आली! मग काय विचारितां तिघींचें जुपलं व एकच दंगा सुरू झाला; तेव्हां माळीवर पुष्कळ लोक आले होते. तिथं यांचीं तोंडं ऐकूं आलीं. ह्मणून शंभूराव खालीं आले. तों यांना पहातांच पार्वतीबाईला फारच स्फुरण चढलें नि वाक्चातुर्याची तर कमालच करून सोडली. तो थोडासा मासला इथं देतें. " नांदा आपल्या बहिणीला घेऊन नी करा संसार! मी निघून जातें! किंवा विष खातें! नाहींतर जीव देतें! मग तुह्मीं खुशाल बहिणीला घेऊन संसार करा. सगळ्यांचें छळून संपलं नि आतां हिचं राहिल आहे, ती घेउंदे छळून. यांचा किती ह्मणून छळ काढूं! माझी अब्रू घेतली, माझी मजा पाहण्यासाठीं निघून गेली, आजपवतर मी केलेल्याचे उपकार फेडिले. आपला पैसा जाळून टाकून आतां माझा

पैसा जाळण्यासाठीं आली आहे. नीट रहाणार असेल तर राहुदे; नाहींतर मी आपली बहीण आणून ठेवणार. हिला तेल, शिंगेकाई सुद्धां किती लागते, मी म्हणून सोसलें. जिला वर्षांत एकदांसुद्धां तेलाची जरूर नाहीं, व शिके-काईची गरज त्याहून नसतां हें बोलणं शंभूरावाना अगदीं खरं वाटत होतें. कारण ते चित्राप्रमाणें भिंतीला टेंकून बायकोचं बोलणं ऐकून घेत होते, व मधून मधून तिला स्वस्थ हो, शांत हो, असं म्हणतहोते; कारण तिची मुद्राच तशी झाली होती. तोंडानं वाक्चातुर्य चाललं होतं, डोळ्यांनीं पाण्याच्या धारा चालल्या होत्या, अंगाला कांपरा सुटला होता, अशी स्थिती पाहिल्यावर खरं कोण म्हणणार नाहीं? भिकी भाऊजयीला छळत नाहीं असें कोण म्हणेल? मग प्रत्यक्ष नवऱ्यादेखत जर इतका आकांत केला तर खरं वाटणं साहजीकच आहे. शंभूराव सर्व ऐकून घेऊन भिकीवर ताव-दारून ह्मणाले चल माझ्या घरांतून; मी तुला आणन माझी चूक झाली. मी ह्मटलें आतां फारदिवस झाले आहेत तेव्हां जमेल. पण तें अधिकच. कमी नाहीं, असो. चल ह्मणजे झालं. भिकी ह्मणाली चल ह्मणजे कुठें जाऊं? भीक माग, हवेंतें तें कर, ऊठ आधिं तंटा नको माझे घरांत. पार्वतीबाई ह्मणते, नशिबीं असेल तर माग भीक. तशी भिकी ह्मणाली, वहिनी बोलूं नको. हात जोडतें; तुह्मी दोघें खुशाल नांदा. जीव देऊं नको व वीष खाऊं नको. तुझे-

पुढें डोकें टेंकतें. गप्प रहा, ही मी निघालें. शंभूरावाकडे पाहून ह्मणते, नवरा मेल्यावर माझ्यासारख्या ज्या निर्धन असतील त्यांना ममतेचीं मनुष्येंसुद्धां कशीं वागवितात हें उदाहरण जगांत देण्याला सांपडेल. कारण माहेरीं ऐवढ्या अपराधाबद्दल मेरू एवढी शिक्षा. मग अदूरदर्शीपणानें अथवा जुलमानें, दुराग्रहानें अथवा दुर्दैवामुळें, अथवा अंतःकरणांतील दुष्ट बुद्धीनें एखादी गोष्ट आपले हातून चुकली तर याहून अधिक शिक्षा ती काय राहिली? ममतेच्या व हक्कानें राहण्याच्या घरांत सुशील व सद्गुणीमनुष्य टिकत नाहीं. मग एखादा दुर्गुणीमनुष्य क्षणभर तरी कसा टिकणार? मायेचा एकही उपयोगी पडणार नाहीं. मग आपल्या मनुष्यांचा काय उपयोग झाला? मी असा चमत्कार पहातें कीं मोल देऊन ठेविलेला नोकरसुद्धां त्यांना जवळ वाटतो पण ही अनाथ झालेली बायको काबाडकष्ट करणारी व बिनपगारी विश्वासूक नोकर असतां तिला सुख नाहीं. व तिजवर विश्वास नाहीं. हा केवढा चमत्कार पहा! आतां सर्वच तशीं असें ह्मणत नाहीं. परंतु **जिच्याजवळ पैसा नाहीं तिची बहुतेक स्थिती अशीच**; ह्मणून तो तंटा पाहून मला फार वाईट वाटलें. कारण माझ्या माहेरचीं व सासरचीं माणसें श्रीमान् होतीं; तशींच सद्गुणी होतीं ह्मणून मला फार सुखांत ठेविली होती. तो थोरपणा त्यांचा झाला; पण भिकीप्रमाणें जर माझे हातून एखादी गोष्ट झाली तर आपली स्थिती अशीच होणार याप्र-

माणें मनांत येऊन तिजविषयीं मला फारच कळकळ वाटली; मी बापुला ह्मटलं हिची स्थिती अशी कां? सासरचें नाहींच का कुणी. बापू ह्मणाला कोणी नाहीं एक सासूमात्र आहे तिचीसुद्धां दोनप्रहरची पंचाईत. मग हिला कोण विचारतो? तो ह्मणाला तिची सर्व हकीगत मला माहीत आहे. एके दिवशीं शंभूराव मजकडे सांगत होते. १००० रुपये हुंडा देऊन भिकूचें लग्न मोठ्या समारंभानें केलें. सासऱ्याला १००।१५० रुपये पगार होता. तो सर्वेअर होता. मी ह्मटलं मग अगदींच कसं कांहीं नाहीं? तो ह्मणाला थांब; तुला हिची सर्व हकीगत सांगतों. हिचे सासरची मूळची गरिबी पण सासरा फार हुशार निघाला. व लहान वयांतच काम लागलें. त्यांनें लग्न गरीब स्थितींत झालें होतें. त्यांना भाऊबंद कोणी नव्हते, ते एकटेच कायते. पुढें त्याना मुलें फार झालीं नाहींत. दोन मुली नी एक मुलगा. तो हिचा नवरा. मुलाचे लग्नापर्यंत त्यानें ७।८ हजारांची इस्टेट केली होती. ह्मणून त्यानां मुलीही मोठ्यांच्या सांगून येऊं लागल्या; ह्मणून त्यांनाही हुंडा चढविण्याची उमेद आली. पण शंभुरावांचे वडिलांनीं विचार केला कीं एकुलता एक मुलगा. सासरा फार संभावीत. मुलीला सुख होईल. कुठें दुसरें पहातां. शुभस्य शीघ्रं; एकदांचें आटपून घेतलें झालें. आपल्याला तरी मुली कुठं आहेत? हीच काय ती अपूर्वाईची. शंभूरावाचे पाठीवर २।३ गेल्या. ही नवसानें एकटी कुठं वांचली. दोन पैसे

गेले तरी चिंता नाहीं मुलगी सुस्थळीं पडते. काळजी नाहीं ह्मणून ठरविलें. शिवाय विहिणीचे बारीक सारीक मान पान करण्याचे कबूल केलें. असो. याप्रमाणें लग्न ठरलें. पण विहिणीला वाटावें कीं इतक्या हुंड्यालायक आपले घरीं जिनगी तरी काय आहे? निदान त्यांना जर कबूल आहे तर आपणही संभावीतपणानें वागून त्यांना त्रास न देतां सुशील व सद्गुणी म्हणून घेऊं. पण छेः तें तर नाहींच; मात्र उलट विहीणबाईचे मनांत विचार येऊं लागले कीं आपण कोणचे वेळीं विहिणीला अडवून धरावी. व कोणचेवेळीं तिचा अपमान करावा! व माझे मैत्रिणी देखत मजपुढें तिला कोणचे वेळीं वांकवावी, असाच त्यांचा विचार. लग्नांतील सर्व माहिती तुला हवी असेल तर घरांत विचार म्हणजे सर्व काडिनकाडी माहिती मिळेल. असें सांगून बापू आपल्या उद्योगाला गेला. मला तें सर्व केव्हां ऐकेन असें झालें होतें. मग जेवण-खाण आटपतांच आमचे कथेला सुरवात झाली. वहिनी म्हणाली भिकूचे लग्नांत मी माहेरीं होतें म्हणून मला माहीत आहे. भिकूच्या सास्वेचा वाडाही आमचे शेजारीं होता. म्हणून सर्व गम्मत पहाण्यास मिळाली; सर्व लग्नाचा सोहळा मी पाहिला व तिचे लग्नानंतर झालेला परिणाम भिकूकडून ऐकिला. व थोडा शंभुरावांकडून पुरुषांना (नवऱ्याला) कळला. ती सर्व हकिगत ऐकून मला असें वाटलें कीं ही हकीगतसुद्धां पुस्तकांत देण्यासारखी आहे.

कारण, हा सोहळा ऐकून पोरकटपणाबद्दल आमच्या सुशिक्षित भगिनींना सावध केल्यासारखें होईल. म्हणून ती सर्व हकिकत देतें.

भिकीच्या सास्वेच्या मनांत होतां होईल तों आपल्या विहिणीची फजिती करावी. माझे पुरूष तरी मला कांहीं बोलणार नाहींत. कारण मी लग्न ठरतेवेळींच कबूल करून घेतलें आहे कीं मी हवं तें करणार. लग्नांत चार दिवस मला एक शब्द सुद्धां बोलतां कामानये. माझे मुलगे कांहीं दोन चार नाहींत. हाच काय तो एकटा; ह्मणून माझे सर्व मान व हौस झाली पाहिजे. याप्रमाणें विहिणबाईनीं आपल्या सखी समुदायांत हा बेत ठरविलाच. मग काय! लग्नाला सुरवात होतांच ज्या बायकांना नवऱ्याचा धाक नाहीं व उद्योग थोडा, त्यानीं इकडच्या चहाड्या तिकडे, व तिकडच्या चहाड्या इकडे सांगून तंटा सुरू केला; इकडे होय बाई तुमचं खरं, आणि तिकडे हो, त्यांची चूक, त्यांनीं असं करूं नये. याप्रमाणें दोन्ही मांडवांत गोंडा मिरवून गांवांत जाऊन दोन्ही विहिणींची टवाळी करण्याला पुन्हा तयारी आहेच. झालं, यापासून फायदा काय ह्मणाल तर चार दिवस जेवण व एखाद दुसरा खण व पांचपन्नास आल्या गेल्यांकडून खर्पूस शिव्या हाच काय तो. आतां विहिणीचा प्रकार पाहिला तर तिचे अंगांत मंडपदेवता शिरलेली; मग काय विचारितां! करवलीला फूस देऊन पुढें करून

आपण आहेच मागें. त्या दोघी चुकल्या तर त्यांचे मागून गुप्त त्यांच्या मैत्रिणी आहेतच. इतकी तयारी असल्यावर न्यून तें काय पडणार ? आणि तंट्याचा दुष्काळ तो कसला ? याप्रमाणें भिकूच्या सास्वेची तर तयारी झाली. मग रुखवत जातांच तें पाहून तिला फार राग आला; कारण पुण्याकडे रुखवत नेण्याची फार मोठी चाल असते. ती कांहीं भिकीच्या आईला माहीत नव्हती. नेतेवेळीं पुष्कळ नेलं होतं. पण शिवराची जमा फार थोडी होती, ह्मणून धुमत होती. हळद कुंकू होऊन ओंटी जशी पुढें आली तशी ह्मणाली माझी ओंटी भरूं नका. माझ्या मानकर्णी स्वयंपाक घरांत वीस आहेत. त्यांचेपुढें नारळ व विडे ठेऊन नमस्कार करून या. माझं माहेरचं कोणी आलं नाहीं, त्यांचे २५ नारळ ठेवा. उरला तर माझी ओंटी भरा. पहा विहीणबाईचें बोलणें किती शुभ आहे तें. आपलेपुढें सौभाग्यदायक ओंटी आली असतां तिचा अव्हेर करून माझी ओंटी भरूंनका. आंतल्या बायकांना नारळ आधीं द्या. ह्मणजे इतके जेव्हां नारळ त्यानीं तयार करावेत तेव्हां विहिणीला एक घालावा. असो. याप्रमाणें रुखवत आटपलं. लग्नानंतर विहीण रुसून गेली, तिला समजूत करून आणतेवेळीं तिनं हट्ट धरिला कीं मला इंग्रजी बाजा पाहिजे. लग्नाचे-वेळीं आपला खडबड वाजत करत नेला नवरा मुलगा. इतकं वेठीनं करण्याला का मुलाचं लग्न होत नव्हतं

ह्मटलं मुहूर्त टळेल बोलूं नये. आतां कांहीं गडबड नाहीं. आणा बाजा तेव्हां येईन झालं. आधीं तजवीज नसल्या मुळें पैसे फार पडले, पण करतां काय आणला बाजा नी नेली समजाऊन. पुढें जेवणाची अक्षत आली. तेव्हां तसंच; कीं सर्व गांव माझे ओळखीचा; तेव्हां थोरांमोठ्यांच्या बायका माझे पंक्तीला आल्या पाहिजेत. म्हणून माझं एक मनुष्य देतें नी तितकीं घरें तुम्ही सांगा. पहा वाचकहो, ही चाल आमच्यांत किती हास्यास्पद घातली आहे! कीं गांवापरगांवचे आप्तइष्ट मंडळींना सुद्धां आदरसत्कार करण्याचा बोजा त्यांच्यावर लादण्यापेक्षां ते आपले भूषणाला करतील अगर सोडतील. त्यांचे मनांत नसतां अगांतुकीप्रमाणें त्यांचेवर लादण्यापेक्षां आपले घरीं पक्वान्नें करून आपले आप्त व स्नेह्यांच्या बायका बोलावून आदरसत्कार करून त्यांना एकेक नारायणपेठी नेसिवलं तरी नको कोण म्हणतो; तर नुसत्या जेवणासाठीं त्यांच्याकडे तोंड पसरणें म्हणजे फारच वाईट. पण ही गोष्ट आमच्या हौशी व उदार भगिनीच्या मनांत सुद्धां येत नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याहून आणिक एक चमत्कारिक चाल आहे; ती ही कीं पंक्तींत एखादा जिन्नस कमी असें वाटलें कीं, तोच सर्वांनीं मागावा. पण आपण हा याचकपणा काय म्हणून करतों हें ह्याही मंडळींपैकीं कोणाचेही मनांत येत नाहीं. याचप्रमाणं **कर्नाटक** प्रांतांतील लोकांत तरी विहि-

णीचे जेवणाची अशी गम्मत आहे कीं, पंक्तींत जिन्नस घेऊन आलेला वाढपी बेलाशक ओवळा करून हातांतील भांडें काढून घेतात, व पानांत अन्नाच्या राशी; म्हणजे जिन्नस पुरे म्हणून म्हणायचें नाहीं. गोरगरीबसुद्धां अशी अन्नाची नासाडी करितात. व त्याला **भोम** म्हणतात. आणि लग्न ठरते वेळीं करार करितात कीं आमचे ३ किंवा ४ भोम झाले पाहिजेत. जितके मोठे तितकी अन्नाची नासाडी फार करितात. पहा केवढा अज्ञानपणा हा! मग सुधारणा ती कसली झाली? पूर्वार्जित जो वेडेपणा तो तर तसाच आहे. मुलीचे बापाला जेरीला आणून त्यांनीं वारंवार हातीं पायीं पडल्यापासून आपल्याला समाधान मानून घेणें म्हणजे काय भूषण असेल तें असो. या प्रमाणें भिकूताईचें लग्न झालं; अंगावरही बरेच दागदागिने घातले होते. भिकूचे लग्नाला महिना झाला किंवा नाहीं तोंच तिच्या सासऱ्याला पन्नास ५० रुपये चढले. मग काय जो तो मुलीचा पायगूण चांगला म्हणूं लागले.

पण सहा महिने झाले नाहीं तोंच ताप येऊन अर्धांग लटकें झालें. मग काय? विलंब न करितां लौकरच गूण येईल ह्मणून खर्चाकडे न पहातां मोठमोठाले सर्जन व नामांकित डाक्टर आणून सुमारं वर्षभर सर्व उपाय करून थकले. शेवटीं डाक्टर ह्मणाले कीं गुण येण्याचं कांहीं लक्षण दिसत नाहीं तुम्ही खर्च किती दिवस करणार? ह्मणून आमचें औषध बंद ठेवा व तुमचे

नेटिव वैद्यांकडून घेऊन पहा, पण तोही उपाय झाला तरी गुण नाहीं. शिवाय लक्ष्मीबाई घरांतल्या घरांत भटजींना विचारीत, तेव्हां ते ह्मणत कीं देवीचा राग आहे. त्याचें निवारण झालें. मग जोतिषांनीं सांगितलें कीं, ग्रहाचीं दानें करा. तींहीं झालीं पण पहिला दिवस. बिचारी लक्ष्मीबाई करते काय? तिचें मन वाहूं लागलें कीं कोणी कांहीं सांगितलें तरी पैशाकडे मागें पुढें न पाहतां सर्व करी. आणि म्हणे उद्यां बरे झाले म्हणजे पैसे मिळतील. एकदां बरे होऊंदेत. आमच्यांत म्हण आहे कीं, दहा मरोत परंतु दहांचें पोषण करणारा जगो. त्या प्रमाणें सर्व तसें म्हणत पण तसें कसें होईल. शेवटीं विनायकराव व ह्मणाले कीं मी आतां औषध ह्मणून घेणार नाहीं. कांहीं असो. **गाणगापुरास** श्री दत्ताजवळ जाऊन रहातों तेथेंच काय तें होऊंद्या. मग त्यांची सर्व मंडळी तेथें जाऊन राहिली. आणि पदरमोड करीत; कारण घर ना दार शेत ना भात; जी इस्टेट ते सर्व सास्वासुनाचे दागिने. व थोडीं चांदीचीं भांडीं ही एक. दुसरी जिनगी ह्मणजे हंड्या, दिवे, कांचेचीं कपाटें, कोच, खुर्च्या, टेबलें, तसबिरा, लोड, तक्के, गालिचे यांशिवाय बहुतेक निरुपयोगी सामान. घेतेवेळीं खूब पैसा पडला पण देतेवेळीं किती येणार? असो. याप्रमाणें थोडें बहुत सामान लिलांव करून व बाकी सर्व अव्यवस्था करून सर्व नोकरांना रजा देऊन गरीब स्थितीनें तिथं जाऊन राहिले. नी पुढें उभयतां सेवेला गुंतलीं. मग-

काय बाळ रिकामाच; हिंडण्याफिरण्याला मोकळाच. त्याचा उद्योग काय ह्मणाल नर नदींत पोहत राहणं, सेवेकऱ्यांची टवाळी करणं व संध्याकाळीं भीमानदीवर हवा घेत फिरणं, उरला वेळ वाचीत बसणं. केव्हां तरी विनायकराव बोलत कीं, बाळ हिंडूं नको पुढें तुझ्या जन्माची वाट काय? मी मिळविलेलें तें मीच संपविलें. पहा बाबा विचार तुझा तूंच. लगेच लक्ष्मीबाई ह्मणे कीं तो तरी काय करील. शाळा ना सुळा हिंडतो झालं. घरांत येऊन बाळ ते मला वरचेवर बोलतात कांहीं तरी वाचीत जा बरं, अगदींच विसरून जाशील, ह्मणून सांगतें. तो ह्मणे शाळेंत घाल ह्मणजे मास्तर देतील तें वाचीन. अरे बाळा शाळा नसली ह्मणून दुसरें सुद्धां वाचूं नये का? होय किती तरी कादंबऱ्या शिवाय नवीन नवीन नाटकें आणून नेहमीं वाचीत असतों. या बोलण्यानें लक्ष्मीबाई नुसत्या हंसल्या नी उद्योगाला गेल्या. पहा, थोरांचा मुलगा लाडका त्यांत एकुलता एक, ह्मणूनच असे हुषार. कारण लहानपणापासून शिक्षणच तें कीं बाळ नाटक मागतो, द्या त्याला नाटक. शाळेला जाईल तों जाईल नाहीं तों नाहीं. जाईल मेला! त्याच जन्माला आला आहे. खेळुंदे चार दिवस, आहेत कुठं मुलं? या बोलण्यानं विनायकराव गप्प बसत. त्याचें फळ हल्लीं मिळत आहे. या प्रमाणें दोन अडीच वर्षें गेलीं. बहुतेक जिनगी आटोक्यांत आली. भिकीच्या दोन नणंदा आहेत ह्मणून मागें सांगितलें आहे त्यांत

मोठी मुलगी अगदीं गळ्याला आली. ह्मणून तिथेंच त्यांनीं एकीचें लग्न केलें. दिवसेदिवस गुण न येतां ते अशक्त झाले. मुलाचे विद्येचे दिवस फुकट जातात ह्मणून विनायकरावानीं आपल्या गावीं जाण्याचा बेत केला; पण खेड्यांत जाऊन तरी काय करितात तेथें शाळेची सोय नाहीं ह्मणून पुण्यांतच आपला पहिला वाडा सोडून दुसरे ठिकाणीं लहानशी जागा घेऊन राहिले कारण आपल्या ओळखीचे मोठाले कामगार आपल्याला कांहीं तरी उपयोगीं पडतील व मुलाचे विद्येची व्यवस्था कांहींतरी त्यांचे कडूनच लावावी. ह्याच हेतूनें ते पुण्यास येऊन राहिल्यावर त्यांचे भेटीला पुष्कळ लोक येत. त्यांचेजवळ विनायकराव बाळाचे विद्येविषयीं बोलत. पण सर्व लोक ह्मणत कीं छेः तुह्मीं अगदीं काळजी करूं नका. बाळ आमचा मुलगा, तुमचा नव्हे अशी उमेद देत. परंतु उपयोगीं पडतील तर शपथ. असो, याप्रमाणें पुण्यांत आल्यावर वर्षाचे आंतच त्यांची प्रकृती अधिक क्षीण होऊन त्यांना देवाज्ञा झाली. मग लक्ष्मीबाईला दुःख झालं खरं, पण बसून कसं चालतं. आलेला दिवस तरी भागला पाहिजे. ह्मणून आलेल्या मंडळी जवळ गोष्ट काढीत कीं कोच, खुर्च्या, पलंग, कपाट, तसबिरा, हंड्या, कांचेचे तऱ्हेतऱ्हेचे दिवे, शिवाय कांचेचीं व चिनई मातीचीं भांडीं, हीं सर्व लिलांव करून काय होईल तें पहा. माझी स्थिती काय आहे हें तुह्मीं पहातांच

आहां. असो. ह्याप्रमाणं सर्व काढलं, पण जुन्या जिनमांना पैसे ते कितीसे येणार? मग करते काय. सांगतील तें हूं ह्मणून व देतील तें घेऊन स्वस्थ बसणं माग. कारण सर्वच लोक करणार, करतील तें खरं. असो. इतकी स्थिती झाल्यावर बाळ जरा शद्धीवर आला व कांहीं तरी उद्योग करण्याचें मनांत येऊन एखादी नोकरी लावून द्या असें आपल्या वडिलांचे स्नेह्यांना सांगूं लागला, पण नोकरी तरी कशी लागते, विद्या नाहीं. अभ्यास तरी होईना, म्हणून एका खेडयांत स्टेशनावर १० रुपये महिना पगार ठरवून एकदा अडकला. आणि त्यानं दोन पगार आईकडे पाठविले ह्मणून लक्ष्मीबाईला ही दुःखांत सुख झालें कीं बाळानं आपली वाईट स्थिती लवकरच मागें सारिली ह्मणून फार आनंद झाला. पण म्हण आहे ना? भिकेची हंडी शिंक्याला चढत नाहीं. तें अगदीं खरं कारण विनायकरावांची मूळची स्थिती ह्मणजे ते फार गरीब त्यांत हे थोडे नांवा-रूपाला येऊन या भूमीवर थोडेंसें तेज पडलें नाहीं तोंच चतुर्दशीच्या चंद्राप्रमाणें लगेच मावळले. पण इतकें होऊन तरी दुर्दैवाचें समाधान कुठं झालं? अमावास्येच्या रात्रीप्रमाणें वंशवृद्धि व भाग्योदय या दोहींचा क्षय होऊन ह्या भूमीवर निर्वंशरूप अंधःकार पडण्याची वेळ आली नी स्टेशनावर प्लेग होऊन बाळ वारला. दुर्दैवानें आपलें समाधान करून घेतलें. आतां लक्ष्मीबाईच्या दुःखाचें वर्णन करण्याची बाकी राहिली नाहीं.

ह्मणून इथं त्याविषयीं कांहीं लिहीत नाही, व अशा प्रकारें आकाश कोसळल्यावर मग जीं मनुष्यें पूर्वी लक्ष्मीबाईचा शब्द झेलत व त्या किती रागानें जरी असल्या व किती अविचारानें बोलल्या तरी त्यांचे कौतुक करीत तींच मनुष्यें आतां तिच्या हांकेला जुमानत नाहींत. याप्रमाणें लक्ष्मीबाईचे संसाराचा अस्त झाल्यावर सर्व अपेश भिकूचे पायगुणावर येऊन ठेपलें. नी त्यापासून तिला त्रासही होऊं लागला. सासू वारंवार ह्मणे कीं ही पांढरे पायांची कुटली विळी घरांत आली तें घर धुवून टाकलें. बसा आतां स्वस्थ. ही बातमी भिकूचे आईला कळतांच ती भिकीला घेऊन आली. नी तिला पहातांच आईनी बाप यांची जी स्थिती झाली ती लिहितां पुरवत नाहीं. त्यांना फारच पश्चात्ताप झाला कीं आपण मुलाचें सुद्धां मत न घेतां हौसेनें केलं काय नी झालं काय. याचखंतीनें तीं उभयता क्षीण होत चाललीं. आतां भिकूचे अंगावर १००।२०० चा विषय होता. पण तो सासूनें घेऊन आपले लोकांत जी भूषणास्पद चाल आहे ती अमलांत आणून तीस एका लुगड्याची मालकीण केली. मग अर्थातच भिकू कफल्लक माहेरीं आली आणि तिकडे सासूजवळ जें कांहीं उरलं होतं तें सर्व निरुपयोगी झालें. कारण आपण मुलगा आहे ह्मणून थोडं बहुत ठेवलं होतं. तें हें जरीचें कापड, शालजोड्या, चांदीचीं भांडीं व बारीकसारीक अंगावरचे दागिने तरी ते वापरलेले. तेव्हां सहजच किंमत कमी

होणार. पण करतात काय. दुसरी मुलगी लग्नाला आली तें लग्न तरी झालं पाहिजे. आणि आपलीही तजवीज केली पाहिजे कांहीं तरी. सर्व जिनसा जमा केलेल्या मात्र आपण होऊन लोकांना जरी सध्या म्हटलं कीं सहजच किंमत कमी होणार. पण जरूर असल्यामुळें निरुपाय झाला तरी ७।८०० शें रुपये आले त्यांतच थोडे बहुत लग्नाला लागले. बाकी तिचे पोटाची बगमी असेल नसेल. नणदेचे लग्नाला भिकी गेली नाहीं. तिनं तें सर्व आई-जवळ सांगितलें व आई म्हणाली मी तुला तिकडे पाठविणार नाहीं. मजकडे कांहीं कमी नाहीं; स्वस्थ जेऊन खुशाल ऐस. म्हणून पुन्हा भिकू सासरीं गेली नाहीं. पण तिचे आईबाप एकदां खंती घेऊन खंगले, नी क्षीण होत चालले. दिवसेदिवस आजारी होऊन तीं उभयतां १९ दिवसांचे अंतरानें स्वर्गवासी झालीं. त्या वेळीं **शंभूराव** सुटीला गेले होते. ते तेथील सर्व व्यवस्था करून भिकू व आजीला घेऊन इकडे आले. इकडे आल्यास सुमारें २ वर्षें होतात. आल्यावर सहा महिने सुमार पार्वतीबाई चांगल्या होत्या. आणि म्हणत कीं आपलेवांचून दुसरें त्यांना कोण आहे? मूल ना बाळ, एकटा जीव. त्यांचीं मनुष्यें खुशाल राहोत. त्यांना कांहीं कमी नाहीं. पण हीं अक्षरें सदोदित जर मनांत असतीं तर शंभूरावांना सुख व आनंद झाला असता. पण ओढून ताणून आणलेली माया किती दिवस टिकणार?

आणि हें मनुष्य आपल्यावरच अवलंबून आहे. व आपल्या खेरीज याला गत्यंतर नाहीं, असें मनांत येऊन अभिमान वाटतो. त्यांत बायकांना फार; मी ह्मणून करतें. माझे शिवाय कोण करणार? मिळविणारा कांहींच बोलत नाहीं कारण त्याना वाटतं कीं माझें कर्तव्य आहे. याप्रमाणें पार्वतीबाईना अभिमान वाटून भिकूला यःकश्चित् समजूं लागल्या. नी खा, जेव, वासपूस सर्व सोडून जरा कुर-कुर करूं लागल्या कीं शहरची वस्ति; खर्च का थोडा लागतो? आह्मीं दोघे तिघे बसून गप्पा ठोकतों; त्या करितां जाऊं. एकवेळ मी करीन व एकवेळ त्या करतील. पाणी चावीचं बाकी काम कसलं? शाग्रीत नको नी कांहीं नको. शंभूरावाचे मनांत शाग्रीत ठेवण्याचा होता तरी ह्या रिकाम्या ह्मणून झालं नाहीं. आतां बायकोनं सांगितलं तरी गैर-शिस्त वाटलं नाहीं. कारण तोही खर्च ह्मणून ते तसंच करा ह्मणाले. पण घरांतील सर्व भिकूवरच पडे कारण आजी ह्मातारी. आतां वहिनी नेहमीं कण्हत कुंथत आजारी. त्यांत मुलाचे सुश्रूषेखालीं मुळींच फावत नसे. दोनप्रहरीं शंभूराव स्नानाला आले ह्मणजे त्यांचं पाट पाणी करून वाढलं कीं झाल्या मोकळ्या. असं दुसरं काम केलं केलं नाहीं नाहीं, तसेंच संध्याकाळीं कचेरीहून आले नी स्वयं-पाक झाला का असें विचारून आंत यायचं. नी वन्सं नेसूं सोवळं? झालं का? हो, नेस भात झाला ह्मणजे बाकी सर्व स्वयंपाक पाट पान मांडून तयारी असली ह्मणजे खूष

असून दोन शब्द चांगले बोलत, आणि इतकी जर तयारी नसेल तर दंगा कांहीं विचारूं नका. लगेच चवताळून हें आदळ तें आदळ व आपटा आपट गडी मनुष्यांवर काढून एकच दंगा होत असे. आणि मुद्दाम उशीर करायचा नी कोणी विचारलं कीं झालंका? तर ह्मणे कीं होईल तेव्हां करीन माझं मला पुरे झालं आहे. गडबड असेल त्यानं करून घ्यावं, मी असंच करणार असें ह्मणून हश! हुश! करून एकदां जेवण आटपलं कीं कृतकृत्य होई. अगदीं नम्रपणानं शंभूराव ह्मणत इतका उशीर कां तर ह्मणे कीं माझा का।ा नव्हता आला, माझी तयारी करण्याला? ह्या बोलण्यानें भिकीला किती वाईट वाटे कीं, नेहमीं करून एखादे वेळीं कंटाळा केला तर इतका अनर्थ होतो ह्मणून रागानं केव्हां करी, केव्हां तरी करीत नसे. एकवेळ ती फार आजारी ह्मणून ती ( बापूची बायको ) समाचाराला गेली ती सांगत होती कीं शंभूराव दोनप्रहरीं औषध व थोडेंसें दूध देऊन कचेरीला गेले व ते घरीं येईपर्यंत तसंच राहतं ह्मणून भिकू मधलेवेळीं घ्यावयाचें घेऊन आली. व आग्रह करूं लागली तेव्हां पार्वतीबाई ह्मणाल्या तुह्माला पहातां माझ्या अंगाची आग होते. व डोकें फिरून जाऊन मला दुखणें येण्याचें कारण तेंच झालं. माते हात जोडितें, मला तुझा श्राप लागुंदे नको व तुझें करणं मला नको. भिकी म्हणाली वहिनी तुला श्राप देऊन माझें कोणतें हित मी करून घेणार? म्हणून तूं मला बोलतेस. तुला माझा कंटाळा आला असेल

तर मला घरांतून जा म्हणून सांग. मात्र असलीं बालटं घेऊन बोलूं नको. माझे रहाण्यानें जर तुझा असा परिणाम झाला असेल तर मी आनंदानं जातें. माझं एक जिवाचं काय? कुठंतरी पोट भरीन तूं बरी हो आणि तुम्हीं उभयतां खुशाल नांदा. मी घरांतून जावं एवढ्यासाठीं इतका अनर्थ नको होता. म्हणून मी सांगतें मी आणलेलं खा नी बरी हो लवकर. असी पुष्कळ तिनें प्रार्थना केली पण ऐकतो कोण? मग हळूहळू तंटा सुरू झाला नी गडी मनुष्यांकडून किंवा शेजाऱ्याकडून करून घेतं. पण भिकूशीं भाषण करणार नाहीं व तिला सांगणार नाहीं. व चहाड्याही सुरू झाल्या. घरांत पहात नाहीं, कांहीं काम करत नाहीं. पण हीच जर बोलत नाहीं नी दुसऱ्याकडून करून घेते; तर पाहील काय! व करील काय? हें शंभूरावाना कसं कळणार? बायको सांगते तें खरं. कुटुंबांतील मनुष्यांबरोबर बायको कशी वागते हें नवऱ्याला कधीं समजणार नाहीं, कारण नवऱ्याशीं बायकोचें वर्तन फार मायेचें निष्कपटपणाचें असतें म्हणून बायको जें त्यांना सांगे तें अगदीं खरं वाटे. असो. ह्याप्रमाणें शंभूरावांचा रागही भिकूचे नजरेस पडूं लागला. नी केव्हां केव्हां ते म्हणूं लागले कीं झाली का मक्तेवार? अगदीं मक्त्यानें काम करा, एखादं अधिक होईल असं घालून पाडून बोलत; परंतु शंभूरावांचे बोलण्यावर भिकूनें कधीं उत्तर दिलें नाहीं नी पण पुढें उभीही राहिली नाहीं त्यामुळें पार्वतीबाईचा चहा चालला होता जें सांग

तील तें खरं व बोलतील ती पूर्वदिशा. होतां होतां ती गोष्ट मी पाहिली ती या तऱ्हेला येऊन पोहोंचली ह्मणून जवळ कांहींतरी अर्थ पाहिजे. पण उपाय नाहीं. ही सर्व भिकूची हकिगत भावांचे व भाऊजयीचे तोंडून ऐकतांच माझ्या स्थितीचं सर्व चित्र डोळ्यांपुढें उभें राहिलें. कारण मी जरी सुखांत होतें तरी पैशाचे मानानें माझी व भिकीची स्थिती एकच होती ह्मणून तिच्यावर जो प्रसंग तोच आपल्यावर असें समजून मनांत आलंकी. आपल्या देशांत नवीन नवीन रोग उत्पन्न होऊन अकालीं मृत्यू फार होऊं लागले त्यांत विशेष तरुण मुलांवर आढळतात. ह्मणून ह्याचा विचार आपले विद्वान बंधू करतील अशी आशा मुळींच नाहीं. ह्मणून मनांत येऊन मी बोललें कीं, कां उपाय नाहीं? केलें तर सर्व होण्यासारखें आहे; परंतु मनांत मात्र आणलें पाहिजे. पण तुमचे मनांत येणार कसं? बरोबरच आहे कीं,

याचकाविणें काय, खोळंबला दाता। तोची धांवे हीता आपूलिया॥

तुकाराम.

ह्मणून माझ्या अनाथ भगिनी साठीं मीच तुह्मांजवळ भीक मागतें. कारण तुह्मीं विद्वान आहांत. नेहमीं तोंडानं लेक्चर व हातानं निबंध या शिवाय देशोन्नतीसाठीं लाखो-रुपये फंड जमाकरून राष्ट्रीयसभा भरवितां. आपले लोक व आदरसत्कार या साठीं पुष्कळ परदेशी माल खरेदी करितां. दुसरें रेलवे कंपनीकडे सभेनिमित्य तुमचे पैसे

किती जातात तें तुमचे तुह्मांला माहीत. बुट्टीभर पेरून मूठभर उगवतें त्याप्रमाणें तुमचे खर्चाचा फायदा आहे. तरी त्यांतच आनंद मानून तोच धंदा जारीनें चालविला आहे. मात्र समजून ठेवा कीं आपले दरवाज्यांत पुष्कळ भिकाऱ्यानीं गोंधळ करून सोडला. आणि एखादा धरणी घेऊन बसला कीं भीक घातल्याशिवाय मी जाणार नाहीं. बसला ह्मणून आपण नोकराला आज्ञा देतो कीं मुठभर घाल. पण ती मूठ मरून घेऊन आपल्या समुदायांत जाऊन आनंद प्रदर्शित करितो कीं आपल्यावर यजमानाची कृपा आहे. आज इतकी मिळाली, उद्यां आपण जें मागूं तें मिळेल ह्मणून आशेनं आनंद मानून घेणें ह्मणजे मोठी चूक आहे. कारण पुन्हा त्यांचे दरवाज्यांत जातांच त्रासानं एखाद्या हलकट नोकराकडून ढकलून खड्ड्यांत पडण्याची वेळ येते. आणि प्रसंगीं पडून प्राण जाण्याची वेळ येते; नी केव्हां केव्हां प्राणांतही होतो; परंतु यजमानावर कोणाची फिर्याद चालणार? ह्मणून आपल्यांतच कलकलाट करून गप्प रहातात. किंवा तुमचे कलकलाटामुळें आंवळा देऊन कोहाळा नेतात. व आपलें कर्तव्य ते मुकाट्यानं करून घेतात तुह्मीं मात्र ईर्षेनें, कांहीं हौसेनें भूमि निर्धन करून सोडली. आणि कफल्लक होण्याची वेळ आली असो. आतां वाचकहो, माझ्या ह्या अनधिकारी बोलण्याचा तुह्मांला राग येईल. पण मी हें तुह्मांला ह्मणत नाहीं. तुमचा जो उद्योग चालला आहे तो अगदीं योग्य आहे;

कारण बलिष्ठ लोकांत बलहीन मनुष्य गेला तर त्यास यश कसं येईल? पण गप्प बसून उपयोग नाहीं. कारण पुष्कळ लोक जमा करून गोंगाट केला ह्मणजे सहजच त्यांचे मनांस भीति उत्पन्न होऊन आपला पाय जरा मागें घेऊन विचार करतील. नी कालांतरीं सुखी होण्याची वेळ येईल. म्हणून तुमचा उद्योग चालला आहे तो ठीक आहे. म्हणून माझेविषयीं तुमचे मनांत रोष येऊं देऊं नका. माझे माहेरचीं व सासरचीं मनुष्यें पुढारी असल्यामुळें बहुतेक वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, घरीं येतात आणि मलाही हौस असल्यामुळें मी नेहमीं वाचीत असे म्हणून माझे दिरांनींही मला कधीं प्रतिबंध केला नाहीं; इतकेंच नव्हे तर जीं वाचण्यायोग्य पत्रें व पुस्तकें तीं आपण होऊन मज-कडे पाठवीत असत म्हणून मला थोडी माहिती होती. मी भावांबरोबर बोलत बसलें ह्मणजे केव्हांतरी मौजेनें हा वाद घालीत असें तोच याठिकाणीं दिला आहे. मात्र मी ह्मणतें कीं हक्काची कां असेना! तुह्मी परदेशी लोकांकडे भीक मागतां तर त्यांना तुमची दया कशी येणार? ह्मणून मी तसें न करितां माझ्या मायेच्या व स्वजातीच्या आणि योग्यतेच्या मनुष्यांकडे माझ्या देश भगिनीकरितां तुम्हांजवळ भीक मागतें तर तुह्मीं मला किती घालितां तें पहाणार आहें. व मी जें मागणार तें तुमचे तिजोरीपैकीं मागत नाहीं व फंडही जमा करा असें म्हणत नाहीं तर तुम्हीं देश सुधारणेसाठीं रात्रंदिवस झटत आहां त्याप्रमाणें

स्वजातींचे मुली बहिणींच्या हितासाठीं जर झटलां तर तुमचे विद्वत्तेला भर पडून तुमचे कुटुंबांतील अनाथ झालेल्या कन्या भगीनींना दीनत्व प्राप्त होणार नाहीं; व तुम्हीं मनावर घेतलें तर क्षणभरसुद्धां लागणार नाहीं म्हणून म्हणतें कीं, आपल्या देशांत म्हणा अथवा आपल्या ब्राम्हण लोकांत म्हणा, हुंडा घेण्याची जी चाल पडली आहे ती किती चमत्कारिक आहे. हुंडा घेणें ह्मणजे आपली देणगी वसूल केल्याप्रमाणें लोक करितात. पण हुंडा घेणें आणि वरदक्षणा देणं ह्या भाषेला अंतर किती आहे पहा, वरदक्षिणा देणं ह्मणजे मुलीचे बापाचें खुषीचें काम आहे. व हुंडा घेणें ह्मणजे मुलाचे बापाचा जुलूम होय. असें मला वाटतें. कारण मला शास्त्र माहीत नाहीं. भाषा येत नाहीं. मात्र लोकप्रचारावरून व चाललेल्या वहिवाटीवरून थोडेसें ध्यानांत येतें. दानपात्रावर त्याचे योग्यतेची दक्षिणा दिली पाहिजे. त्याशिवाय फळ नाहीं म्हणून कन्यादानावर दक्षिणेची योग्यता केली आहे. व मुलीचे बापानें अनुकूल असेल त्याप्रमाणें वरदक्षिणा द्यावी ती मुलाचे बापानें खुशीनें घ्यावी व खुशाल वापरावी. कारण यथाशक्ति दानपात्राचा अंगिकार करून ममतेनें तिला गृहिणी हें नाव दिल्यावर दोन्हींला अधिकारी झाली मग यत्किंचित् हुंड्यांचें तेज तिथें नाहीं. ह्मणून तुह्मांला जड न पडतां आलेला हुंडा सुनेच्या किंवा मुलाच्या नांवानें जर संग्रह कराल तर सहजच तुमच्या मुलीचें कल्याण होणार आहे. आतां सुनेचे दुर्दैवानें जर

अनुकूल दिवस आले तर तो पैसा तुमच्या मुलाचेच संसाराला लागणार आहे. व भिकूप्रमाणें जर कदाचित् प्रसंग आलातर परस्पर तिघांची बेगमी झाली. यांत तुमचा तोटा तो काय ? झालं आतां माझ्या ह्या बोलण्याचा आमचे प्रिय बंधू अथवा भगिनींना राग येईल कीं लग्नाचे वेळीं वाईट मनांत आणणें ह्मणजे अशुभ आहे. पण आपण लग्नाला निघालों ह्मणजे वाटेंत अडचण पडेल ह्मणून सर्व सामग्री घेतों इतकेंच नव्हे तर औषधें सुद्धां घेतों ह्मणून कोणी आजारी पडावा आणि आणलेल्या औषधांचा उपयोग व्हावा अशी इच्छा नसते. औषध नसलें तरी हरकत नाहीं पण प्रसंगीं उपयोगीं पडेल ह्मणन वाईट मनांत आणून सामग्री पाहिजे त्याचप्रमाणं ही गोष्ट आहे तर ज्याला ह्मणून आपलें कुटुंब सुखानें राहण्याची इच्छा आहे त्यांनीं विवाहाच्या आधीं हे विचार मनांत आणले पाहिजेत. बरें हुंडा तरी तुमचे तिजोरीला कुठं पोंचतो ? तो ही नाहीं. कारण हुंडा घेणाऱ्यामागें अनेक लचांड आहेत; कोणी ह्मणतो हुंड्याप्रमाणं दागिने घातले नाहींत. कोण ह्मणतो त्या प्रमाणें खर्च नाहीं. पण खर्च ह्मणजें काय ? तर, दारू, नाच आणि मेजवान्या. अगांतुकाला जेवण मिळत नाहीं. व दरिद्याला मूठभर भीक मिळत नाहीं. मात्र हजार हुंडा तर दोन हजार खर्च. बरं इतकें करून तरी लोकांचें समाधान होतें का ? तेंही नाहीं. कारण ब्राह्मण ह्मणतात योग्यतेप्रमाणें दक्षिणा दिली नाहीं. चैनी व

उनाड लोक बोलतात थोडे पैसे देऊन नायकिणी सुमार आणल्या; जेवणार ह्मणतात पक्कानें बिघडलीं, आचारी ह्मणतात पैसा रगड दिला नाहीं. झालं तुमचे चांगुलपणाचा निकाल लागला, ह्मणून ह्मणतें कीं, आलेला हुंडा परस्पर अडकला ह्मणजे तुह्मीं सत्रा लचांडांतून मोकळे होऊन उभय पक्षांचें कल्याण होईल. आतां अशी एक कल्पना निघतें कीं, सर्वांनाच हुंडा कुठें येतो? व न आल्याची व्यवस्था कशी करावी? तर सर्वांविषयीं माझं बोलणें नाहीं. कारण जे प्रतिदिवशीं भिक्षेचे तांदूळ व दक्षिणेचे पैसे जमवून निर्वाह करितात. त्यांनाही उद्योग आहे त्यांविषयीं माझा वाद निराळा आहे. माझें मत इतकेंच आहे कीं, आपली ऐपत नसतांही मुलीचे आमरणात कल्याण असावें आणि अनास्था न व्हावी म्हणून ऐपत नसतांही सावकाराचे घरीं हेलपाटे घालून मोठ्याच्या व नामांकिताच्या घरीं आपल्या मुली देतात. आणि यांचे मुलीवर जर उदाहरण दिलेल्या मुलीप्रमाणें प्रसंग आले तर खर्च करणाराचे मनांत किती दुःख होईल व परिणाम कसा होतो तोही मागें दिलाच आहे. म्हणून हा विचार करणारे वडील मंडळीवर अवलंबून आहे. इतकें बोलून मी भावांना म्हटलें कीं तुम्हीं देशोन्नतीसाठीं रात्रंदिवस झटतां व पुढारी म्हणून घेतां. परंतु दिव्याखालीं अंधार त्याप्रमाणें तुमची स्थिती आहे. सहज होण्यासारखें काम असतां तुमचे हातून होत नाहीं. मग गरिबाची तोड

तुमचे ध्यानांत कशी येणार ? याकरितां मी सांगतें कीं कुटुंबांतील अनाथ बायांवर प्रेम काय ? तर घरांतून बाहेर जाऊ नये. गुप्त त्रास सोसून घरांत रहावें; ह्मणजे काय ? मागें एक वेळ मी सांगितलें आहे कीं आई जेऊं घालीना नी बाप भीक मागूं देईना. तशी आमची स्थिती असतां आमचे हातून चांगलीं व नांवाजण्यासारखीं कामें कोणतीं होणार ? कारण निर्धनता व पराधीनता ह्या दोन्ही मध्यें अडकलेला निराश्रित मनुष्य काय करणार ? आतां कुणाचे मनांत आलें असेल कीं आपल्या देशांत प्रसूती प्रसंग वरचेवर येतात व ते प्रसंग निवारणाऱ्या बायका फारच थोड्या. शिवाय, अनेक बायकांचीं दुखणीं आहेत त्यांचे निवारणार्थ डाक्टराजवळ वाचालता करणें म्हणजे किती कठीण पडतें. म्हणून ज्या बायकांवर संसाराचा बोजा नाहीं व मागें कसली काळजी नाहीं म्हणून त्यांचे हातून हीं कामें फार निर्वेधपणानें होतील. प्रशस्तपणानें दुखणें निवेदन केल्यामुळें अनेक रोग मागें तात्काळ हटतील. व सहज गरीब लोकांचेंही कल्याण होण्यासारखें आहे. कारण डाक्टरांना गरीब लोक फार भितात. ह्याविषयीं माझे मनांत वारंवार येतें पण मनांत येऊन करतां काय ? जवळ पैसा नाहीं, आणि हा बोजा व ही मींड कुणाला घालावी ? व घालून तरी देणार कोण ? काबाडकष्ट करूनही सुखानें अन्न घालून चिरगुट वस्त्र देणें त्यांना फार जड पडतें व तेवढ्यासाठीं वशिले लावण्याची वेळ येते. मग हा खर्च

संभाळणार कोण? कोणाचे तरी आधारानें बाहेर जावें तर नानातऱ्हेचे लोक अपवाद ठेवणार, यासाठीं घरांतच कायतें होऊंदे. ह्मणून स्वस्थ बसतात व न कर्त्याचा वार शनिवार त्या प्रमाणें कोणी ह्मणतात कीं बायकांजवळ पैसा असला ह्मणजे कोणाला त्या जुमानीत नाहींत. ह्मणून परतंत्रांत ठेऊन वाक्शब्दांनीं घायाळ केल्यामुळें एकमेकांत असलेला आनंद जाऊन तें मनुष्य नजरेपुढें नकोसें होतें. ह्मणून मी ह्मणतें कीं अर्ध भाकरीवर तिची सत्ता ठेऊन कुटुंबांत असलेला आनंद कायम राखा; कारण मुलगा वेडा होईल ह्मणून आपली इस्टेट कोणी शेजाऱ्याचे स्वाधीन केली आहे का? नाहीं. तो कसाही होवो! बापाचें कर्तव्य त्यानं केलेंच पाहिजे. त्या प्रमाणें हेंही तुमचें कर्तव्य आहे. परतंत्रतेनें अन्याय व जुलूम होण्याचा संभव आहे; ह्मणून ही नड ज्या दिवशीं मागें होईल त्या दिवशीं खरी सुधारणा झाली असें आह्मी ह्मणूं. विद्यालयें घालून स्त्रियांना शिक्षण दिलें हें उत्तम. व त्या सुधारणेमुळेंच आह्मांलाही हें ज्ञान झालें व हे विचार मनांत येऊं लागले, कीं मौल्यवान हिरा कोंदणांत बसविला ह्मणजे वाईट सोन्याची किंमत हिऱ्याबरोबर चढते व तोच हिरा मोकळा केला ह्मणजे त्या सोन्याला कोणीही विचारीत नाहींत. तशी पती नस्तां बायकोची स्थिती. काकुळबाणीनें कोणी ये ह्मणत नाहीं इतकेंच नव्हे तर ती

आली तर उलट तिरस्कार करितात. ह्मणून वाचकहो, विनंती करून मागतें कीं तिला पुढें येण्याची व तुह्मी तिरस्कार करण्याची वेळ न यावी अशी तजवीज कराल अशी आशा आहे.

माझे मनांत हे विचार फार दिवस येत होते पण कोणचे निमित्तानें हे विचार उघडकीस आणावे ह्मणून मनांत घोळत होतें. झाला कांहीं तरी आधार पाहिजे ऐकण्यांत पुष्कळ ऐकल्या पण प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज मला सर्व खोट्या वाटत; कारण ह्मण आहे कीं, एका हातानें टाळी वाजत नाहीं. पण टाळी वाजविण्याची वेळ आली म्हणजे हात देणं भाग पडतं. हा अनुभव प्रत्येकांना आहे म्हणून अधिक लिहिण्याची जरूर नाहीं. असो. हा अनुभव पाहून मला जो अभाव होता तो जाऊन मनाला वाटलं कीं माझा हेतु सिद्धीला जाण्याची वेळ आली, नि मला उमरावतीस जाण्याची बुद्धि झाली, व सर्व प्रकार पाहून माझ्या मनानं अगदीं हांव घेतली. मला कांहीं सुचेना व मनांत आलें कीं हा अज्ञातवास जर मीं प्रसिद्ध केला तर आपले देशबंधू कांहीं तरी तजवीज करितील. कारण देश सुधारणेंसाठीं जे रात्रंदिवस झटत आहेत ते आपले घरचीं कामें करण्याला क्षणभर विलंब लावणार नाहींत. व निर्धनतेची अनास्था व मनांतील इष्ट हेतु प्रसिद्ध केल्याखेरीज आपल्या देशबंधूंना समजणार नाहीं; व समजल्या खेरीज दया येणार नाहीं

म्हणून उगाच हा लेख लिहिण्याला आरंभ केला. आणि बहुतेक लिहून झाल्यावर भावांजवळ गोष्ट काढिली. कारण त्यांचे मत्ताखेरीज माझा हेतु शेवटाला जाणार कसा? म्हणून माझा सर्व हेतु सांगून छापण्याचें काम तुम्हांवर अवलंबून आहे असें म्हणतांच त्यांनीं मोठ्या खुषीनं हो. लिहून झालं म्हणजे आमच्याकडे दे आम्ही सर्व व्यवस्था करितों असं सांगितलं. पहा तरी ह्या त्यांचे उमेदी बोलण्याने मला फार आनंद झाला नी मी चालविलेलें काम शेवटाला नेलें. माझ्या प्रियकर बंधूंनीं जी मला मदत केली तीबद्दल त्यांची उतराई होण्याला मजकडे कांहीं साधन नाहीं. म्हणून जरा वाईट वाटलं, पण त्यांचे बोलण्याने मला समाधान झालें व मला शंभर रुपये ओंवाळणी घातल्यापेक्षां अधिक आनंद झाला आणि मनांत आलें कीं ह्याच प्रमाणें आपले विद्वान देशबंधु जर माझ्या अल्प बुद्धीनें लिहिलेल्या लेखाला यश देऊन मदतरूप ओंवाळणी घालतील तर मलाच काय पण माझ्या अनाथ भगिनींना जन्माची ओवाळणी घातलेलें श्रेय येणार आहे. म्हणून माझ्या अशुद्ध लिहिण्याची अवज्ञा न करितां व माझ्या अनधिकारी बोलण्याचा राग मनांत न धरितां आपला भाऊ समर्थ असला म्हणजे ममतेनें लहान बहीण हट्ट धरून काहीं तरी बोलते, व आपली मागणी मागून घेते तसें बहिणी-प्रमाणें मजवर प्रेम ठेऊन इष्ट हेतू पूर्ण कराल व वेड्या-वांकड्या बोलण्याची मला क्षमा कराल अशी आशा आहे.

## तरुण विधवा भगिनींना दोन शब्द.

माझ्या भगिनींनो, वरील उदाहरणानें आमच्यांतील विधवांची सांप्रतची दुःखमय स्थिति मीं सर्वांपुढें ठेविली आहे. आमच्या फुटक्या नशीबानं अगर पूर्वजन्मींच्या पापाचे योगानें आह्मांवर हा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांत आमच्या ब्राह्मण समाजांतील जुन्या घातक रूढींची भर पडून तर कडेलोटच झाला आहे. हल्लीं देश सुधारणेच्या मोठमोठ्या उलाढाली आमचे देशबंधू करीत आहेत. स्त्रियांना शिक्षण द्यावें, त्यांना कमी न मानतां पुरुषां इतके हक्क द्यावे, स्त्री हा आपल्या संसाराचा जन्माचा सोबती आहे त्यास प्रेमानें व आपल्या बरोबरीनें वागविलें ह्मणजे त्यांत उभयतांचें कल्याण आहे, हुंडा व दागिने ह्या दोन गोष्टींनीं उभयपक्षांतील ऐक्याचा भंग होतो ह्मणून हुंड्यासाठीं मुलीच्या बापास नडवूं नये, बाल विवाह बंद करावा, केवळ पैशा रितां आपल्या पोटचे गोळे ह्मातार्‍या कोतार्‍याच्या गळ्यांत बांधून त्यांच्या जन्माचें मातेरें करूं नये, अशा अनेक रीतीनीं आमचे देशबंधु ओरड करितात व समाजसुधारणा करण्याचा आव घालितात. पण तोच मनुष्य आपल्या घरच्या बायकांशीं तसें वर्तन ठेवतो काय? आमच्यासारखी विधवा बहीण घरीं आली तर तिच्या दुःखाचें शांतवन करून तिचा कष्टमय मार्ग सुगम करून देण्याचा तो प्रयत्न करतो काय? जुन्या घातक चाली मोडून

आपल्या घरच्या बायकांना तो समान वागवितो काय ? असें जोंपर्यंत आमच्या बंधूंच्या हातून होत नाहीं तोंपर्यंत हीं पुराणांतलीं वांगीं पुराणांतच राहणार ! बोलणें सोपें पण करणी फार अवघड. आपण त्यांच्यावरच अवलंबून उपयोग नाहीं. दुर्दैवानें जरी आमची सर्वस्वी पाठ धरिली आहे तरी आपण धैर्य सोडतां कामा नये. आपण संकटांत पडलों तर खऱ्याच, पण आमच्यासारख्या ज्या गरीब गाईवर असा प्रसंग कोसळेल त्यांच्यासाठीं आपण श्रम केले पाहिजेत. आमची दीन दशा, आमचे हाल बंधूंपुढें वरचेवर मांडून त्यांच्या हृदयास द्रव आणला पाहिजे. आमची हृदयद्रावक कहाणी ऐकिली तर दगडास सुद्धां पाझर फुटेल; मग हे तर पाठीला पाठ लावून आलेले आमचे बंधु; ह्यांना आमची कींव नाहीं का येणार ? मी ह्मणतें खातरीनें येईल. शिवाय, भगिनींनो, तुह्मांला आणखी एक गोष्ट सांगतें. तुमचें आचरण निर्मळ व निष्कलंक असूंदे. परमेश्वराची भक्ति नेहेमीं अंतःकरणांत असूंदे. धर्म व नीति ह्यांचा आश्रय करून लोकांकडून भलेपणा मिळवून घ्या. तुमचा देह सांदीकोंपऱ्यांत पडला हें तर खरेंच; पण त्याचा सदुपयोग करण्याचें तुमच्याच हातीं आहे. आजपर्यंत झालेल्या मोठमोठ्या स्त्री पुरुषांचीं चरित्रें लक्षांत आणा. त्यांनीं आपला देह परोपकारासाठीं कसा झिजविला हें ध्यानीं आणून त्यांचा कित्ता गिरवा. हा देह ह्मटला ह्मणजे

पाण्यावरचा बुडबुडा; आतां आहे अंमळशानें नाहीं; परलोकींचा निरोप कोणचे वेळेस येईल ह्याचा कांहीं नेम नाहीं. ह्मणून आपले मनांत रात्रंदिवस भूतदया ठेवा. परोपकार ह्मणजे पुण्य व परपीडन ह्मणजेच पाप हें तत्व ध्यानांत ठेवा. 'सत्कर्मयोगें वय घालवावें । सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥' हें समर्थ श्री रामदास स्वामींचें वाक्य तुमच्या हृत्पटलावर खोदून ठेवा. **अहिल्या, द्रौपदी, सीता, दमयंती, सावित्री** वगैरे साध्वींचीं चरित्रें नेहमीं डोळ्यापुढें ठेवा. त्यांच्यावर केवढालीं संकटें आलीं होतीं तथापि केवळ ईश्वरावर भरंवसा ठेवून दृढनिश्चयानें त्या सर्व संकटांतून कशा पार पडल्या हें तुह्मांस माहीत आहेच. त्यांचा कित्ता अक्षय्य डोळ्यापुढें ठेवून तो वळवा; व आपल्या अशिक्षित बहिणींना वळविण्यास लावा. सुखसौभाग्यमंडित ज्या तुमच्या बहिणी मुली असतील त्यांना पति हेंच स्त्रियांचें दैवत हें समजावून द्या; गृहिणी ह्या पदास युक्त असें आचरण त्यांजकडून करवा; व त्यांचा संसार सुखासमाधानानें चालेल असें त्यांना वळण लावा. असें करणें हें तुमचें कर्तव्य आहे. हें तुह्मीं केलें ह्मणजे ह्यांत सर्व कांहीं आलें. हा मोठाच परोपकार व देहाचें सार्थक्य केल्यासारखें आहे. शेवटीं, हे माझ्या लाडक्या भगिनींनो, पुन्हां सांगतें, ह्या संकटाच्या स्थितींत सुद्धां, ईश्वराचें भजन पूजन, नामस्मरण करीत कालक्रमणा केली तर, तुह्मांला सुख प्राप्त होईल ह्यांत संशय नाहीं.

ईश्वर अनाथाचा वाली आहे. तो तुह्मांस कधीं अंतर देणार नाहीं. द्रौपदीचा टाहो कानीं पडतांच तो प्रभु एकदम धांवला; अहिल्या शिळा होऊन पडली असतां पादस्पर्शानें तिला उत्तम गति दिली; सावित्रीचें सौभाग्य नष्ट झालें असतांही तिला तिचा पति पुन्हां परत दिला; तो दीनदयाळ प्रभु आमच्या संकटांची कहाणी ऐकून धांवून येणार नाहीं काय ? येईल; खचित येईल. मागील जन्मीं केल्या कर्मांचीं फळें आह्मीं ह्या जन्मीं भोगीत आहोंत; ह्मणून ह्या जन्मीं तरी सत्कर्मे करून व पुण्यमार्गानें चालून पुढील साधन करून ठेवूंया; ह्मणजे तो जगच्चालक परमात्मा आह्मांस उत्तम गति देईल ह्यांत शंका नाहीं. इतकें सांगून तुमचा निरोप घेऊन मी हा लेख पुरा करितें.

समाप्त.

C
T 68